भारत सरकार

विधि व न्याय मंत्रालय

# किमान वेतन अधिनियम, १९४८

(सन १९४८ चा अधिनियम क्रमांक ११)

[१ मार्च, १९८९ रोजी यथाविद्यमान]

# The Minimum Wages Act, 1948

## (Act No. 11 of 1948)

[*As in force on the 1st March, 1989*]

(महाराष्ट्र विशोधनांसहित)

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत शासनाच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले
(१९९१)

[किमत रु. ४-००]

# प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक १ मार्च १९८९ रोजी यथा विद्यमान असलेला दि मिनिमम वेजेस ॲक्ट, १९४८ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ भारताचे राजपत्र, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १, अंक १, दिनांक ९ जुलै १९९० यात पृष्ठे ५३ ते ६९ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली :
दिनांक ९ जुलै १९९०.

व्ही. एस. रमादेवी,
सचिव, भारत सरकार.

# PREFACE

This edition of the Minimum Wages Act, 1948 as on the 1st March 1989 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 1, Vol. 1, dated 9 th July 1990 on pages 53 to 69.

This authoritative text was published under the authority of the President under section 2, clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi, 9th July 1990.

V. S. RAMADEVI,
Secretary to the Government of India.

# किमान वेतन अधिनियम, १९४८

## विशोधन अधिनियम व अनुकूलन आदेश यांची सूची

१. विधि अनुकूलन आदेश, १९५०.

२. किमान वेतन (विशोधन) अधिनियम, १९५० (१९५० चा ५६).

३. भाग ब राज्ये (कायदे) अधिनियम, १९५१ (१९५१ चा ३).

४. किमान वेतन (विशोधन) अधिनियम, १९५१ (१९५१ चा १६).

५. किमान वेतन (विशोधन) अधिनियम, १९५४ (१९५४ चा २६).

६. किमान वेतन (विशोधन) अधिनियम, १९५७ (१९५७ चा ३०).

७. किमान वेतन (विशोधन) अधिनियम, १९६१ (१९६१ चा ३१).

८. मध्यवर्ती कामगार कायदे (जम्मू व काश्मीर यांवर विस्तार) अधिनियम, १९७० (१९७० चा ५१).

## महाराष्ट्र सुधारणा अधिनियम

१. किमान वेतन (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९६० (१९६१ चा १०)

२. किमान वेतन (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९६३ (१९६३ चा ३)

*३. किमान वेतन (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९७५ (१९७६ चा २५).

---

*महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग चार, दिनांक १५ जुलै, १९७६, पृष्ठे २२८, २२९ वर प्रसिद्ध केलेला. १ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून, पहा, शासकीय अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. एमडब्ल्यूए-११७६-१२५०-एलएबी ७, दिनांक ३१ जानेवारी, १९७७, **महाराष्ट्र शासन राजपत्र** (विस्तार), भाग दोन, दिनांक ३१ जानेवारी, १९७७, पृष्ठ १०० वर प्रसिद्ध केलेली.

# किमान वेतन अधिनियम, १९४८

## कलमांचा क्रम

कलमे


१. संक्षिप्त नाव व विस्तार.
२. निर्वचन.
३. वेतनाचे किमान दर ठरविणे.
४. किमान वेतन दर.
५. किमान वेतन ठरविण्याची आणि त्यात सुधारणा करण्याची कार्यपद्धती.
६. [निरसित].
७. सल्लागार मंडळ.
८. केंद्रीय सल्लागार मंडळ.
९. समित्या, वगैरेंची रचना.
१०. चुकांची दुरुस्ती.
११. ऐनजिनसी वेतन.
१२. किमान दरांनी वेतन देणे.
१३. सर्वसाधारण कामाच्या दिवसाचे तास ठरविणे, वगैरे.
१४. अतिकालिक कामाचे वेतन.
१५. सर्वसाधारण कामाच्या दिवसाच्या वेळेपेक्षा कमी वेळ काम करणाऱ्या कामगारांचे वेतन.
१६. दोन किंवा अधिक वर्गांच्या कामाबद्दल वेतन.
१७. उक्त्या कामासाठी किमान वेळेवारी दराने वेतन.
१८. नोंदपुस्तके व अभिलेख ठेवणे.
१९. निरीक्षक.
२०. मागण्या.
२१. अनेक कामगारांच्या संबंधात एकच अर्ज करणे.
२१क. न्यायालय शुल्क देण्याची जबाबदारी.
२२. विवक्षित अपराधांबद्दल शिक्षा.
२२-१क. निरीक्षकास अडथळा केल्याबद्दल शिक्षा.
२२क. अन्य अपराधांबद्दलच्या शिक्षेसाठी सर्वसाधारण उपबंध.
२२ख. अपराधांची दखल घेणे.
२२ग. कंपन्यांनी केलेले अपराध.
२२घ. कामगारांना प्रदेय असलेल्या अवितरित रकमांचे प्रदान.
२२ङ. नियोक्त्याची सरकारजवळील मत्ता जप्त करण्यापासून संरक्षण.
२२च. 'वेतन प्रदान अधिनियम, १९४६' अनुसूचित कामधंद्यांना लागू असणे.
२३. विवक्षित प्रकरणी नियोक्त्याला दायित्वापासून सूट देणे.
२४. दाव्यास आडकाठी.
२५. संविदेद्वारे दायित्वमुक्त करणे.
२६. सूट व अपवाद.
२७. अनुसूचित भर घालण्याची राज्य शासनाची शक्ती.
२८. केंद्र शासनाची निदेश देण्याची शक्ती.
२९. केंद्र शासनाची नियम करण्याची शक्ती.
३०. समुचित शासनाची नियम करण्याची शक्ती.
३०क. केंद्र शासनाने केलेले नियम संसदेपुढे ठेवणे.
३१. विवक्षित किमान वेतन दरांची निश्चिती विधिग्राह्य ठरवणे.
अनुसूची.

# किमान वेतन अधिनियम, १९४८

## (१९४८ चा अधिनियम क्रमांक ११)[1]

(दिनांक १ मार्च १९८९ रोजी यथाविद्यमान)

[ १५ मार्च, १९४८ ]

**विवक्षित कामधंद्यामध्ये वेतनाचे किमान दर ठरविण्याविषयी उपबंध करण्यासाठी अधिनियम.**

ज्याअर्थी, विवक्षित कामधंद्यांमध्ये वेतनाचे किमान दर ठरविण्याविषयी उपबंध करणे समयोचित आहे; त्याअर्थी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

**संक्षिप्त नाव व विस्तार.**

१. (१) या अधिनियमास 'किमान वेतन अधिनियम, १९४८' असे म्हणता येईल.

(२) त्याचा विस्तार [2]* * * संपूर्ण भारतभर आहे.

**निर्वचन.**

२. या अधिनियमात, विषय किंवा संदर्भ यामध्ये काहीही प्रतिकूल नसेल तर,—

[3][ (क) "किशोर" याचा अर्थ, जिच्या वयास चौदावे वर्ष पूर्ण झाले आहे, परंतु अठरावे वर्ष पूर्ण झालेले नाही ती व्यक्ती, असा आहे ;

(कक) "प्रौढ" याचा अर्थ, जिच्या वयास अठरावे वर्ष पूर्ण झालेले आहे, ती व्यक्ती, असा आहे ; ]

(ख) "समुचित शासन" याचा अर्थ—

(एक) [4][ केंद्र शासनाच्या किंवा रेल्वे प्रशासनाच्या ] प्राधिकाराअन्वये किंवा त्याखाली चालविलेल्या कोणत्याही अनुसूचित कामधंद्याच्या संबंधात किंवा एखादी खाण, तेलक्षेत्र किंवा मोठे बंदर किंवा [5][ केंद्रीय अधिनियमाद्वारे ] स्थापन झालेला कोणताही निगम याच्या संबंधात केंद्र शासन; आणि

(दोन) दुसऱ्या कोणत्याही अनुसूचित कामधंद्याच्या संबंधात राज्य शासन

असा आहे ;

[6][ (खख) "बालक" याचा अर्थ, जिच्या वयास चौदावे वर्ष पूर्ण झालेले नाही ती व्यक्ती असा आहे. ]

(ग) "सक्षम प्राधिकरण" याचा अर्थ, समुचित शासनाने आपल्या **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या अनुसूचित कामधंद्यांमध्ये कामावर लावलेल्या कामगारांना लागू असलेला राहणीमान निर्देशांक वेळोवेळी निश्चित करण्यासाठी नियुक्त केलेले प्राधिकरण असा आहे;

(घ) "राहणीमान निर्देशांक" याचा, ज्या कोणत्याही अनुसूचित कामधंद्याच्या बाबतीत वेतनाचे किमान दर ठरविण्यात आलेले असतील त्या कामधंद्यांमध्ये कामावर लावलेल्या कामगारांच्या संबंधातील अर्थ, अशा कामधंद्यात कामावर लावलेल्या कामगारांना लागू असलेला राहणीमान निर्देशांक म्हणून सक्षम प्राधिकरणाने निश्चित केलेला आणि **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे प्रसिद्ध केलेला निर्देशांक असा आहे;

(ङ) "नियोक्ता" याचा अर्थ, जी कोणतीही व्यक्ती प्रत्यक्षपणे किंवा अन्य व्यक्तीमार्फत किंवा तिच्या स्वतःच्या वतीने किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीच्या वतीने, या अधिनियमाखाली ज्या कोणत्याही अनुसूचित कामधंद्याच्या संबंधात वेतनाचे किमान दर ठरविण्यात आलेले असतील त्या कामधंद्यात एक किंवा अधिक कामगार कामावर लावते ती व्यक्ती असा आहे, आणि कलम २६ चे पोटकलम (३) यातील मजकूर खेरीजकरून इतरत्र त्यामध्ये पुढील व्यक्तींचा समावेश होतो,—

(एक) ज्या कोणत्याही अनुसूचित कामधंद्याच्या संबंधात या अधिनियमाखाली वेतनाचे किमान दर ठरविण्यात आलेले असतील तो कामधंदा ज्या कारखान्यात चालविण्यात येतो त्या कारखान्याच्या बाबतीत, [7][ 'कारखाना अधिनियम, १९४८' (१९४८ चा ६३) याचे कलम ७, पोटकलम (१)— खंड (च) ] खाली त्या कारखान्याचा व्यवस्थापक म्हणून नियुक्त केलेली कोणतीही व्यक्ती;

(दोन) भारतातील कोणत्याही शासनाच्या नियंत्रणाखाली असलेल्या ज्या कोणत्याही अनुसूचित कामधंद्यांच्या संबंधात या अधिनियमाखाली वेतनाचे किमान दर ठरविण्यात आलेले असतील त्यांच्या

---

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनाकरता पहा, **भारताचे राजपत्र**, १९४६, भाग पाच, पृ. २२४ आणि प्रवर समितीच्या अहवालाकरिता पहा, भारताचे राजपत्र, १९४८, भाग पाच, पृ. ५५ ते ५८.

हा अधिनियम १९६३ चा विनियम ६, कलम २ व पहिली अनुसूची यांद्वारे दादरा व नगरहवेलीवर, १९६३ चा विनियम ७, कलम ३ व पहिली अनुसूची यांद्वारे पाँडिचेरीवर आणि १९६५ चा विनियम ८, कलम ३ व अनुसूची यांद्वारे लखदीव, मिनिकॉय व अमिनदिवी बेटांवर विस्तारित करण्यात आला आहे.

२. "जम्मू व काश्मीर राज्ये खेरीजकरून" हे शब्द १९७० चा अधिनियम ५१ याच्या कलम २ व अनुसूची यांद्वारे वगळण्यात आले (१ सप्टेंबर, १९७१ रोजी व तेव्हापासून).

३. सन १९८६ चा अधिनियम क्रमांक ६१ कलम २३ द्वारे मूळ खंड (क)/ ऐवजी घातले. (२३ डिसेंबर १९८६ रोजी व तेव्हापासून).

४. १९५७ चा अधिनियम क्रमांक ३० कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

५. विधी अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

६. सन १९८६ चा अधिनियम क्रमांक ६१ कलम २३ द्वारे समाविष्ट केले (२३ डिसेंबर १९८६ रोजी व तेव्हापासून).

७. सन १९५४ चा अधिनियम क्रमांक २६ कलम २ द्वारे, "'कारखाना अधिनियम, १९३४' (१९३४ चा २५), कलम ९, पोटकलम (१), खंड (ङ)" ऐवजी दाखल केले.

बाबतीत, कामगारांवर देखरेख व नियंत्रण ठेवण्यासाठी अशा शासनाने नियुक्त केलेली व्यक्ती किंवा प्राधिकरण आणि कोणतीही व्यक्ती किंवा प्राधिकरण याप्रमाणे नियुक्त केलेले नसेल तर त्या खात्याचा प्रमुख;

(तीन) स्थानिक प्राधिकरणाच्या अखत्यारातील ज्या कोणत्याही अनुसूचित कामधंद्याच्या संबंधात या अधिनियमाखाली वेतनाचे किमान दर ठरविण्यात आलेले असतील त्याच्या बाबतीत कामगारांवर देखरेख व नियंत्रण ठेवण्यासाठी अशा प्राधिकरणाने नियुक्त केलेली व्यक्ती आणि जर कोणतीही व्यक्ती याप्रमाणे नियुक्त केलेली नसेल तर त्या स्थानिक प्राधिकरणाचा मुख्य कार्यकारी अधिकारी;

(चार) या अधिनियमाखाली ज्यासंबंधी वेतनाचे किमान दर ठरविण्यात आलेले असतील असा अनुसूचित कामधंदा चालविण्यात येत असेल अशा अन्य कोणत्याही बाबतीत कामगारांवर देखरेख व नियंत्रण ठेवण्याबद्दल किंवा त्यांना वेतन देण्याबद्दल जी कोणतीही व्यक्ती नियोक्त्यास जबाबदार असेल ती व्यक्ती;

(च्) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले असा आहे;

(छ्) "अनुसूचित कामधंदा" याचा अर्थ, अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेला कामधंदा, किंवा अशा कामधंद्याचा एक भाग असलेली कामातील कोणतीही क्रिया किंवा अंग असा आहे;

(ज्) "वेतन" याचा अर्थ, कामधंद्याच्या संविदेच्या व्यक्त किंवा उपलक्षित अटींचे पालन झाल्यास कामावर लावलेल्या व्यक्तीला तिच्या कामधंद्याच्या संबंधात किंवा अशा कामधंद्यात तिने केलेल्या कामाबद्दल तिला जे पारिश्रमिक प्रदेय होऊ शकेल असे पैशाच्या रूपात दाखवता येण्यासारखे सर्व पारिश्रमिक असा आहे [1][आणि त्यामध्ये घरभाडे भत्ता समाविष्ट आहे], पण त्यात पुढील गोष्टींचा समावेश होत नाही :—

(एक) (क्) कोणतीही निवासव्यवस्था, वीजपुरवठा, पाणीपुरवठा, वैद्यकीय सोयी; किंवा

(ख्) समुचित शासनाच्या सर्वसाधारण अथवा विशेष आदेशाद्वारे वगळलेली इतर कोणतीही सुखसोय किंवा कोणतीही सेवा

यांची किंमत;

(दोन) कोणत्याही निवृत्तिवेतन निधीला किंवा भविष्यनिर्वाह निधीला किंवा कोणत्याही सामाजिक विमा योजनेखाली नियोक्त्याने दिलेले कोणतेही अंशदान;

(तीन) कोणताही प्रवास भत्ता किंवा कोणत्याही प्रवास सवलतीचे मूल्य;

(चार) कामावर लावलेल्या व्यक्तीस तिच्या कामधंद्याच्या स्वरूपामुळे येणारा कोणताही विशेष खर्च भागविण्यासाठी दिलेली कोणतीही रक्कम;

(पाच) सेवामुक्त केल्यानंतर द्यावयाचे कोणतेही उपदान;

(झ्) "कामगार" याचा अर्थ, ज्या कोणत्याही अनुसूचित कामधंद्याच्या संबंधात वेतनाचे किमान दर ठरविण्यात आलेले असतील त्या कामधंद्यामध्ये कोणतेही कौशल्याचे किंवा विनकौशल्याचे, अंगमेहनतीचे किंवा कारकुनी काम मोलाने किंवा इनामाच्या बदल्यात करण्याकरिता कामावर लावलेली कोणतीही व्यक्ती असा आहे; आणि जेव्हा कोणत्याही बाहेरच्या कामगाराला दुसऱ्या व्यक्तीने अशा दुसऱ्या व्यक्तीच्या उदीमासाठी किंवा धंद्यासाठी कोणत्याही वस्तू किंवा साहित्य विक्रीच्या दृष्टीने तयार करण्यासाठी, साफ करण्यासाठी, धुण्यासाठी, बदल करण्यासाठी, सजवण्यासाठी, शेवटचा हात फिरविण्यासाठी, दुरुस्त करण्यासाठी, अनुकूल बदल करून घेण्यासाठी किंवा अन्य प्रकारे प्रक्रिया करण्यासाठी दिलेले असून, ती प्रक्रिया त्या बाहेरच्या कामगाराच्या घरी अथवा जी परिवास्तू त्या दुसऱ्या व्यक्तीच्या नियंत्रणाखाली व व्यवस्थापनाखाली नाही अशा अन्य एखाद्या परिवास्तूमध्ये करावयाची असेल तेव्हा, अशा बाहेरच्या कामगाराचा त्यात समावेश होतो; आणि त्यामध्ये समुचित शासनाने कामगार म्हणून जाहीर केलेल्या कामगाराचाही समावेश होतो, परंतु [2][संघराज्याच्या] सशस्त्र सेनेतील कोणत्याही व्यक्तीचा त्यात समावेश होत नाही.

१. सन १९५७ चा अधिनियम क्रमांक ३०, कलम २ द्वारे समाविष्ट केले.

२. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे दाखल केला.

**(झ्) "कामगार" याचा अर्थ, ज्या कोणत्याही अनुसूचित कामधंद्याच्या संबंधात वेतनाचे किमान दर ठरविण्यात आलेले असतील त्या कामधंद्यामध्ये कोणतेही कौशल्याचे किंवा बिन-कौशल्याचे, अंगमेहनतीचे किंवा कारकुनी काम मोलाने किंवा इनामाच्या बदल्यात करण्याकरिता कामावर लावलेली कोणतीही व्यक्ती असा आहे; आणि जेव्हा कोणत्याही बाहेरच्या कामगाराला, दुसऱ्या व्यक्तीने अशा दुसऱ्या व्यक्तीच्या उदीमासाठी किंवा धंद्यासाठी कोणत्याही वस्तू किंवा साहित्य विक्रीच्या दृष्टीने तयार करण्यासाठी, साफ करण्यासाठी, धुण्यासाठी, बदल करण्यासाठी, सजवण्यासाठी, शेवटचा हात फिरविण्यासाठी, दुरुस्त करण्यासाठी, अनुकूल बदल करून घेण्यासाठी किंवा अन्य प्रकारे प्रक्रिया करण्यासाठी दिलेले असून, ती प्रक्रिया त्या बाहेरच्या कामगाराच्या घरी अथवा जी परिवास्तू त्या दुसऱ्या व्यक्तीच्या नियंत्रणाखाली व व्यवस्थापनाखाली नाही अशा अन्य एखाद्या परिवास्तूमध्ये करावयाची असेल तेव्हा अशा बाहेरच्या कामगाराचा त्यात समावेश होतो; [1][आणि तीत कलमे २०, २१, २२, २२क, २२ ख, २२ ग, व २२ घ यांच्या प्रयोजनासाठी जी व्यक्ती कामगार असेल आणि ती वयोनिवृत्त झाल्यामुळे, तो सेवानिवृत्त झाल्यामुळे, बडतर्फ झाल्यामुळे,**

**१. सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम ३ कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आले.**

तिला काढून टाकण्यात आल्यामुळे, कार्यमुक्त करण्यात आल्यामुळे, तिची नोकरी संपवण्यात आल्यामुळे किंवा इतर कारणामुळे कामगार असण्याचे बंद झाले असेल अशा कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो; ] आणि त्यामध्ये समुचित शासनाने कामगार म्हणून जाहीर केलेल्या कामगाराचा समावेश होतो; परंतु संघराज्याच्या सशस्त्र सेनेतील कोणत्याही व्यक्तीचा त्यात समावेश होत नाही.

३. [1][(१) समुचित शासन, यात यापुढे उपबंधित केलेल्या रीतीने,—

[2][(क्) अनुसूचीचा पहिला भाग किंवा दुसरा भाग यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कामधंद्यात वेतनाचे किमान दर कलम २७ खालील अधिसूचनेद्वारे दोन्हीपैकी कोणत्याही भागामध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या ठरविणे. अशा कामधंद्यात कामाला असलेल्या कामगारांना द्यावयाच्या वेतनाचे किमान दर ठरवील :

परंतु, समुचित शासनाला अनुसूचीच्या दुसऱ्या भागामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही कामधंद्यामध्ये कामाला लावलेल्या कामगारांच्या संबंधात, या खंडाखाली संपूर्ण राज्याकरिता वेतनाचे किमान दर ठरविण्याऐवजी, राज्याच्या एखाद्या भागापुरते किंवा संपूर्ण राज्यामधील किंवा त्याच्या भागामधील अशा कामधंद्याच्या कोणत्याही विनिर्दिष्ट वर्गापुरते किंवा वर्गांपुरते असे दर ठरविता येतील; ]

[1][ परंतु, राज्य शासनाला संपूर्ण राज्याकरिता या खंडान्वये वेतनाचे किमान दर ठरविण्याऐवजी राज्याच्या एखाद्या भागापुरते किंवा संपूर्ण राज्यामधील किंवा त्याच्या एखाद्या भागामधील अशा कामधंद्याच्या कोणत्याही विनिर्दिष्ट वर्गापुरते किंवा वर्गांपुरते दर ठरविता येतील आणि कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या अखत्यारातील कामधंद्याच्या बाबतीत राज्य शासनाला विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कोणत्याही स्थानिक प्राधिकरणापुरते किंवा स्थानिक प्राधिकरणांच्या वर्गापुरते असे दर ठरविता येतील; ]

(ख्) अशा रीतीने ठरविलेल्या किमान वेतन दरांचे त्यास योग्य वाटेल अशा कालांतरागणिक—अशी कालांतरे पाच वर्षांपेक्षा अधिक असता कामा नयेत—पुनर्विलोकन करील आणि आवश्यक असेल तर किमान दरात सुधारणा करील :

[3][ परंतु, कोणत्याही कारणामुळे कोणत्याही पाच वर्षांच्या कालांतराच्या दरम्यान समुचित शासनाने कोणत्याही अनुसूचित कामधंद्याच्या संबंधात त्याने ठरविलेल्या किमान वेतन दरांचे पुनर्विलोकन केले नसेल तर, समुचित शासनास उक्त पाच वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर किमान दरांचे पुनर्विलोकन करण्यास आणि आवश्यक असेल तर त्यात सुधारणा करण्यास या खंडात असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे प्रतिबंध होतो असे मानले जाणार नाही आणि अशा रीतीने त्या दरात सुधारणा करण्यात येईपर्यंत उक्त पाच वर्षांचा कालावधी समाप्त होण्याच्या लगतपूर्वी अंमलात असलेले किमान दर अंमलात असण्याचे चालू राहील. ]

(१क) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, समुचित शासनास ज्या कोणत्याही अनुसूचित कामधंद्यामध्ये संबंध राज्यात कामावर लावलेले कामगार एक हजाराहून कमी असतील अशा कामधंद्याच्या संबंधात वेतनाचे किमान दर ठरविण्यापासून परावृत्त राहाता येईल, परंतु जर कोणत्याही वेळी [4]* * * समुचित शासनास ते यासंबंधात करील किंवा करवील अशा चौकशीअंती असे आढळून आले की, ज्या कोणत्याही अनुसूचित कामधंद्याच्या संबंधात वेतनांचे किमान दर ठरविण्यापासून ते परावृत्त राहिले होते त्या कामधंद्यामधील कामगारांची संख्या एक हजारापर्यंत किंवा त्याहून अधिक वाढलेली आहे, तर ते अशा कामधंद्यातील कामगारांना देण्याजोग्या वेतनाचे किमान दर [5][ असा निष्कर्ष काढण्यात आल्यापासून होईल तितक्या लवकर ठरवील ]. ]

(२) समुचित शासनास पुढीलप्रमाणे दर ठरवता येतील :—

(क्) वेळेवारी कामासाठी वेतनाचा किमान दर (याचा यात यापुढे "किमान वेळेवारी दर" असा उल्लेख करण्यात आला आहे) ;

(ख्) उक्त्या कामासाठी वेतनाचा किमान दर (याचा यात यापुढे "किमान कामावारी दर" असा उल्लेख करण्यात आला आहे) ;

---

१. सन १९५४ चा अधिनियम क्रमांक २६ कलम ३ द्वारे हे पोटकलम मूळ पोटकलमाऐवजी दाखल केले.

२. सन १९६१ चा अधिनियम क्रमांक ३१ कलम २ द्वारे खंड (क्) ऐवजी दाखल केला.

३. १९५७ चा अधिनियम ३१-कलम ३ द्वारे समाविष्ट केले.

४. १९६१ चा अधिनियम ३१-कलम २ द्वारे विवक्षित मजकूर गाळला.

५. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे विवक्षित मजकुराऐवजी दाखल केला.

१. सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम ३, कलम ३ द्वारे मूळ परंतुकाऐवजी हे परंतुक दाखल करण्यात आले.

(ग) उक्त्या कामावर लावलेल्या कामगारांना वेळेवारी कामाच्या तत्त्वावर वेतनाचा किमान दर (याचा यात यापुढे "हमी दिलेला वेळेवारी दर" असा उल्लेख करण्यात आला आहे) मिळवून देण्यासाठी अशा कामगारांच्या बाबतीत लागू करावयाचा पारिश्रमिकाचा किमान दर ;

(घ) कामगारांनी जादा वेळ केलेल्या कामाच्या संबंधात जो किमान दर एरव्ही लागू होऊ शकेल अशा किमान दराच्या ऐवजी लागू करावयाचा किमान दर (मग तो वेळेवारी दर असो किंवा कामावारी दर असो) (याचा यात यापुढे "अतिकालिक दर" असा उल्लेख करण्यात आला आहे) ;

[1][(२क) अनुसूचित कामधंद्यात कामावर ठेवलेल्या कामगारांपैकी कोणत्याही कामगारास प्रदेय असलेल्या वेतनाच्या दरासंबंधातील औद्योगिक विवादाच्या संबंधात 'औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७' (१९४७ चा १४) याखाली एखाद्या अधिकरणापुढे किंवा राष्ट्रीय अधिकरणापुढे किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याखाली तशाच स्वरूपाच्या कोणत्याही प्राधिकरणापुढे कोणतीही कार्यवाही प्रलंबित असेल किंवा अशा कोणत्याही अधिकरणाने, राष्ट्रीय अधिकरणाने किंवा अशा प्राधिकरणाने दिलेला निवाडा अंमलात असेल आणि अशी कार्यवाही प्रलंबित असताना किंवा तो निवाडा अंमलात असताना त्या अनुसूचित कामधंद्यासंबंधी वेतनाचे किमान दर ठरविणारी किंवा त्यात सुधारणा करणारी अधिसूचना काढण्यात आली असेल तर, या अधिनियमात काहीही असले तरी अशा रीतीने ठरविण्यात किंवा सुधारणा करण्यात आलेले किमान वेतन दर हे, जेव्हा कार्यवाही प्रलंबित असेल आणि त्यामध्ये दिलेला निवाडा अंमलात असेल त्या काळात किंवा, प्रकरणपरत्वे, निवाडा अंमलात असण्याच्या काळात अधिसूचना काढण्यात आली असेल तर उक्त काळात उक्त कामगारांस लागू असणार नाहीत, आणि अशी कार्यवाही किंवा निवाडा हा अनुसूचित कामधंद्यातील सर्व कामगारांस प्रदेय असलेल्या वेतनदरांच्या संबंधातील असेल त्याबाबतीत उक्त मुदतीत उक्त कामधंद्याच्या संबंधात कोणतेही किमान वेतन दर ठरवण्यात येणार नाहीत किंवा त्यांमध्ये सुधारणा करण्यात येणार नाही.]

(३) या कलमाखाली वेतनाचे किमान दर ठरविताना किंवा त्यात सुधारणा करताना—

(क) पुढील बाबतीत वेतनाचे किमान दर निरनिराळे ठरवता येतील :—

(एक) निरनिराळे अनुसूचित कामधंदे ;
(दोन) एकाच अनुसूचित कामधंद्यातील कामाचे निरनिराळे वर्ग ;
(तीन) प्रौढ, किशोर, बालके व शिकाऊ उमेदवार ;
(चार) निरनिराळे स्थानिक भाग ;

[2][(ख) वेतनाचे किमान दर हे पुढीलपैकी कोणत्याही एका किंवा अधिक वेतन कालावधीच्या गणतीने ठरविण्यात येतील :—

(एक) तासागणिक,
(दोन) दिवसागणिक,
(तीन) महिन्यागणिक, किंवा
(चार) विहित करण्यात येईल अशा कोणत्याही अधिक वेतन कालावधीगणिक,

आणि असे दर दिवसागणिक किंवा महिन्यागणिक ठरविण्यात आले असतील तर, प्रकरणपरत्वे, महिन्याचे किंवा दिवसाचे वेतन परिगणना करून ठरविण्याची रीत दर्शवावी :]

परंतु, जेव्हा 'वेतन प्रदान अधिनियम, १९३६' (१९३६ चा ४) याच्या कलम ४ खाली कोणतेही वेतन कालावधी निश्चित करण्यात आलेले असतील तेव्हा, किमान वेतने ही त्यास अनुसरून ठरविली जातील.

**किमान वेतन दर.** ४. (१) कलम ३ खाली समुचित शासनाने अनुसूचित कामधंद्यांच्या संबंधात ठरवलेला किंवा सुधारलेला कोणताही किमान वेतन दर हा पुढील स्वरूपाचा असू शकेल—

(एक) मूळ वेतन दर आणि अशा कामगारांना लागू होणाऱ्या राहणी खर्च निर्देशांकातील बदलाशी शक्य तितका जुळेल अशा प्रकारे समुचित शासन निर्देशित करील अशा कालांतरागणिक व अशा रीतीने समायोजित करावयाच्या दराने द्यावयाचा विशेष भत्ता (याचा यात यापुढे "राहणी खर्च भत्ता" असा उल्लेख करण्यात आला आहे) ; किंवा

(दोन) राहणी खर्च भत्त्यासह अगर भत्त्याविना मूळ वेतन दर आणि तसे प्राधिकृत असेल त्या बाबतीत सवलतीच्या दरांनी अत्यावश्यक वस्तूंचा पुरवठा करण्याबाबतच्या सवलतीचे रोख मूल्य; किंवा

(तीन) मूळ वेतन दर, राहणी खर्च भत्ता, काही सवलती असल्यास त्यांचे रोख मूल्य मिळून एक सर्वसमावेशक दर.

(२) राहणी खर्च भत्ता व सवलतीच्या दरांनी अत्यावश्यक वस्तूंचा पुरवठा करण्यासंबंधीच्या सवलतीचे रोख मूल्य हे सक्षम प्राधिकरणाकडून, समुचित शासन विनिर्दिष्ट करील अशा कालांतरागणिक अथवा ते देईल अशा निदेशांनुसार संगणित करण्यात येईल.

---

१. १९६१ चा अधिनियम क्रमांक ३१, कलम २ द्वारे समाविष्ट केले.
२. १९५७ चा अधिनियम क्रमांक ३०, कलम ३ द्वारे मूळ खंड (ख) ऐवजी घातले.

**किमान वेतन ठरविण्याची आणि त्यात सुधारणा करण्याची कार्यपद्धती.**

[१][५. (१) या अधिनियमाखाली कोणत्याही अनुसूचित कामधंद्यासंबंधाने वेतनाचे किमान दर प्रथमच ठरविताना किंवा अशा रीतीने ठरविण्यात आलेल्या किमान दरात सुधारणा करताना, समुचित शासन एकतर,—

(क्) ते दर अशा रीतीने ठरविण्याच्या किंवा, प्रकरणपरत्वे, त्यात सुधारणा करण्याच्या बाबतीत चौकशी करून शासनाला समुचित सल्ला देण्याकरिता त्यास आवश्यक वाटतील तितक्या समित्या किंवा उपसमित्या नियुक्त करील, किंवा

(ख्) त्याच्या प्रस्तावांचा ज्या व्यक्तींवर परिणाम होण्याची शक्यता आहे अशा व्यक्तींच्या माहितीसाठी **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे आपले प्रस्ताव प्रसिद्ध करील आणि ज्या दिनांकास त्या प्रस्तावांचा विचार केला जाणार असेल तो दिनांक विनिर्दिष्ट करील—तो दिनांक अधिसूचनेच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आतला नसेल.

(२) पोटकलम (१), खंड (क्) खाली नियुक्त केलेल्या समितीचा किंवा समित्यांचा सल्ला किंवा, प्रकरणपरत्वे, त्या पोटकलमाच्या खंड (ख्) खालील अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापूर्वी, समुचित शासनाकडे आलेल्या सर्व अभिवेदनांचा विचार केल्यानंतर, समुचित शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, प्रत्येक अनुसूचित कामधंद्याच्या संबंधातील वेतनाचे किमान दर ठरवील किंवा, प्रकरणपरत्वे, त्यात सुधारणा करील आणि अशा अधिसूचनेत अन्यप्रकारे उपबंधित केले नसेल तर उक्त अधिसूचना ती काढल्याच्या दिनांकापासून तीन महिने संपताच अंमलात येईल :

परंतु, समुचित शासनाने पोटकलम (१), खंड (ख्) यात विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने वेतनाच्या किमान दरात सुधारणा करण्याचे योजिले असेल तर, ते सल्लागार मंडळाचासुद्धा विचार घेईल.]

६. [सल्लागार समित्या व उपसमित्या] किमान वेतन (विशोधन) अधिनियम, १९५७ (१९५७ चा ३०) कलम ५ द्वारे निरसित.

**सल्लागार मंडळ.**

७. [२][कलम ५ खाली नियुक्त केलेल्या समित्यांच्या आणि उपसमित्यांच्या] कामांत समन्वय साधण्यासाठी आणि सामान्यतः वेतनाचे किमान दर ठरविण्याच्या व त्यात सुधारणा करण्याच्या बाबतीत समुचित शासनाला सल्ला देण्यासाठी समुचित शासन एक सल्लागार मंडळ नियुक्त करील.

**केंद्रीय सल्लागार मंडळ.**

८. (१) या अधिनियमाखाली वेतनाचे किमान दर ठरविण्याच्या आणि त्यात सुधारणा करण्याच्या बाबतीत आणि इतर बाबींच्या संबंधात केंद्र व राज्य शासनांना सल्ला देण्यासाठी आणि सल्लागार मंडळांच्या कामात समन्वय साधण्यासाठी केंद्र शासन एक केंद्रीय सल्लागार मंडळ नियुक्त करील.

(२) केंद्रीय सल्लागार मंडळामध्ये अनुसूचित कामधंद्यामधील कामगारांचे व नियोक्त्यांचे केंद्र शासनाने नामनिर्देशित करावयाचे प्रतिनिधी—त्यांची संख्या समसमान असेल—आणि मंडळाच्या एकूण सदस्य संख्येच्या एक-तृतीयांशापेक्षा अधिक नाहीत इतक्या स्वतंत्र व्यक्ती असतील; अशा स्वतंत्र व्यक्तींपैकी एक व्यक्ती मंडळाचा अध्यक्ष म्हणून केंद्र शासनाकडून नियुक्त केली जाईल.

**समित्या, वगैरेची रचना.**

९. समित्या, उपसमित्या, [३] * * * * व सल्लागार मंडळ यांपैकी प्रत्येकात, अनुसूचित कामधंद्यांमध्ये असणाऱ्या कामगारांचे व नियोक्त्यांचे समुचित शासनाने नामनिर्देशित करावयाचे प्रतिनिधी—त्यांची संख्या समसमान असेल—आणि समितीच्या किंवा मंडळाच्या एकूण सदस्य-संख्येच्या एक-तृतीयांशापेक्षा अधिक नाहीत इतक्या स्वतंत्र व्यक्ती असतील; अशा स्वतंत्र व्यक्तींपैकी एक व्यक्ती अध्यक्ष म्हणून समुचित शासनाकडून नियुक्त केली जाईल.

**चुकांची दुरुस्ती.**

[४][१० (१) **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे समुचित शासनास कोणत्याही वेळी या अधिनियमाखालील वेतनांचे किमान दर ठरविणाऱ्या किंवा त्यात सुधारणा करणाऱ्या कोणत्याही आदेशातील हस्तदोष किंवा आकडेमोडविषयक चुका किंवा अभावित चूकभुलीमुळे त्यात निर्माण झालेल्या चुका दुरुस्त करता येतील.

(२) अशी प्रत्येक अधिसूचना ती काढण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर सल्लागार मंडळापुढे माहितीसाठी ठेवण्यात येईल.]

**ऐनजिनसी वेतन.**

**११.** (१) या अधिनियमाखाली प्रदेय असलेले किमान वेतन रोख रकमेत दिले जाईल.

(२) ज्या बाबतीत वेतन पूर्णतः किंवा अंशतः ऐनजिनसी देण्याची प्रथा असून त्या त्या प्रकरणाच्या परिस्थितीमध्ये ते आवश्यक आहे असे समुचित शासनाचे मत असेल त्या बाबतीत, समुचित शासन

---

१. १९५७ चा अधिनियम क्रमांक ३०, कलम ४ द्वारे मूळ कलम ५ ऐवजी घातले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ६ द्वारे "कलमे ५ व ६ खाली नियुक्त केलेल्या समित्या, उपसमित्या, सल्लागार समित्या आणि उपसल्लागार समित्या यांच्या" या मजकुराऐवजी घातले.

३. वरील अधिनियमाच्या कलम ७ द्वारे "सल्लागार समित्या, सल्लागार उपसमित्या" हा मजकूर वगळण्यात आला.

४. वरील अधिनियमाच्या कलम ८ द्वारे मूळ कलम १० ऐवजी घातले.

शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे किमान वेतन पूर्णतः किंवा अंशतः ऐनजिनसी देण्याविषयी प्राधिकृती देऊ शकेल.

(३) सवलतीच्या दरांनी अत्यावश्यक वस्तूंचा पुरवठा करण्याची तरतूद केली पाहिजे असे समुचित शासनाचे मत असेल तर, समुचित शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे सवलतीच्या दरांनी असा पुरवठा करण्याची तरतूद करण्याबाबत प्राधिकृती देऊ शकेल.

(४) पोटकलमे (२) व (३) यांखाली ज्यास प्राधिकृती देण्यात आली त्या ऐनजिनसी वेतनाची व सवलतीच्या दरांनी करावयाच्या आवश्यक वस्तूंच्या पुरवठ्याच्या संबंधातील सवलतींची रोख किंमत विहित केलेल्या रीतीने अंदाजे ठरवण्यात येईल.

**किमान दरांनी वेतन देणे.**

१२. (१) जेव्हा कोणत्याही अनुसूचित कामधंद्याच्या बाबतीत कलम ५ [१]* * * खालील अधिसूचना अंमलात असेल तेव्हा, नियोक्ता अनुसूचित कामधंद्यामध्ये आपल्या हाताखाली कामाला लावलेल्या प्रत्येक कामगाराला त्याच्या त्या कामधंद्यातील कामगारवर्गाकरिता अशा अधिसूचनेद्वारे जो किमान वेतन दर ठरविण्यात आला असेल त्या दरापेक्षा कमी नसेल असे वेतन, विहित करण्यात येईल अशा मुदतीत व अशा शर्तींच्या अधीनतेने, प्राधिकृत असतील त्या खेरीजकरून कोणत्याही रकमा वजा न करता देईल.

(२) या कलमाखालील कोणत्याही गोष्टीमुळे 'वेतन प्रदान अधिनियम, १९३६' (१९३६ चा ४) याच्या उपबंधांवर परिणाम होणार नाही.

**सर्वसाधारण कामाच्या दिवसाचे तास ठरविणे, वगैरे.**

१३. [२][(१) या अधिनियमाखाली ज्याच्या बाबतीत वेतनाचे किमान दर ठरविण्यात आलेले असतील अशा कोणत्याही अनुसूचित कामधंद्याच्या बाबतीत, समुचित शासनास—

(क) जितके कामाचे तास मिळून एक सर्वसाधारण कामाचा दिवस समजला जाईल त्या तासांची संख्या, त्यातील एक किंवा अधिक विनिर्दिष्ट मध्यांतरे धरून ठरविता येईल;

**[१][(कक) जितके कामाचे तास मिळून एक सर्वसाधारण कामाचा आठवडा समजला जाईल त्या तासांची संख्या ठरविता येईल; ]**

(ख) सर्व कामगारांना किंवा एखाद्या विनिर्दिष्ट कामगारवर्गाला जो विश्रांतीचा दिवस देण्यात येईल असा दर सात दिवसांच्या मुदतीतील एक विश्रांतीचा दिवस आणि अशा विश्रांतीच्या दिवसाबद्दल पारिश्रमिक देणे यांबाबत उपबंध करता येईल;

(ग) विश्रांतीच्या दिवशी काम करण्याबद्दल अतिकालिक कामाच्या दरापेक्षा कमी नाही अशा दराने पारिश्रमिक देण्याचा उपबंध करता येईल. ]

[३][(२) पोटकलम (१) चे उपबंध हे पुढील कामगारवर्गांच्या संबंधात विहित करण्यात येईल अशाच मर्यादेपर्यंत आणि अशाच शर्तींच्या अधीनतेने लागू होतील :—

(क) तातडीच्या कामावर, किंवा ज्याची आगाऊ कल्पना करणे किंवा ज्यास प्रतिबंध करणे शक्य नव्हते अशा कोणत्याही निकडीच्या वेळी कामावर लावलेले कामगार ;

(ख) संबंधित कामधंद्यातील सर्वसामान्य कामकाजासाठी वाढून दिलेल्या मर्यादेबाहेर जे काम अपरिहार्यपणे चालवावे लागते अशा पूर्वतयारीच्या किंवा पूरक स्वरूपाच्या कामावर लावलेले कामगार;

(ग) ज्यांचा कामधंदा स्वरूपतःच अधूनमधून चालणारा आहे असे कामगार;

(घ) तांत्रिक कारणामुळे जे काम कामधंद्याची नियत वेळ संपण्यापूर्वीच समाप्त करावे लागते अशा कोणत्याही कामावर लावलेले कामगार;

(ङ) निसर्गाच्या लहरी वृत्तींवर अवलंबून असलेल्या वेळा खेरीजकरून एरव्ही जे काम चालू ठेवता येत नाही अशा कोणत्याही कामावर लावलेले कामगार.

(३) एखाद्या कामगाराच्या दैनंदिन कामाच्या तासांमध्ये किंवा त्या कामगारासाठी असे दैनंदिन कामाचे तास म्हणून काही निश्चित केलेले नसल्यास, कामाच्या तासांमध्ये, ज्या कालावधीत तो कामावर

**(३) एखाद्या कामगाराच्या दैनंदिन कामाच्या तासांमध्ये किंवा त्या कामगारासाठी असे दैनंदिन कामाचे तास म्हणून काही निश्चित केलेले नसल्यास, कामाच्या तासांमध्ये, ज्या कालावधीत तो कामावर**

---

१. १९५७ चा अधिनियम क्रमांक ३०—कलम ९ द्वारे "किंवा कलम १०" हा मजकूर वगळण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम १० द्वारे कलम १३ याला त्या कलमाचे पोटकलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम १० द्वारे भर घालण्यात आली.

**१. सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम ३, कलम ४ द्वारे हा खंड समाविष्ट केला.**

असूनही त्या कामी त्याला शारीरिक हालचाल करण्याची किंवा सतत लक्ष ठेवण्याची आवश्यकता नसेल अशा निष्क्रियतेच्या कालावधींचा समावेश सर्वसाधारणपणे होत असल्यामुळे तो कामधंदा अधून-मधून चालणारा कामधंदा असल्याचे समुचित शासनाने जाहीर केलेले असेल तर, तो कामधंदा पोट कलम (२), खंड (ग) च्या प्रयोजनार्थ स्वरूपत: तसा कामधंदा असेल.]

असूनही त्या कामी त्याला शारीरिक हालचाल करण्याची किंवा सतत लक्ष ठेवण्याची आवश्यकता नसेल अशा निष्क्रियतेच्या कालावधींचा समावेश सर्वसाधारणपणे होत असल्यामुळे तो कामधंदा अधून-मधून चालणारा कामधंदा असल्याचे समुचित शासनाने जाहीर केलेले असेल तर, तो कामधंदा पोटकलम [1][किंवा कामगार उप-आयुक्ताच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेला असा जो अधिकारी राज्य शासनाने याबाबतीत विशेषकरून प्राधिकृत केला असेल त्याने] (२), खंड (ग) च्या प्रयोजनार्थ स्वरूपत: तसा कामधंदा असेल.

**अतिकालिक कामाचे वेतन.**

१४. (१) ज्याच्या वेतनाचा किमान दर या अधिनियमाखाली तासागणिक किंवा दिवसागणिक किंवा विहित करण्यात येईल अशा अधिक वेतनकालावधीगणिक ठरविण्यात आला असेल असा एखादा कामगार कोणत्याही दिवशी सर्वसाधारण कामाचा दिवस भरण्यासाठी आवश्यक असणाऱ्या तासांच्या संख्येपेक्षा अधिक वेळ काम करील तेव्हा, अशा प्रकारे त्याने जितका अधिक वेळ काम केले असेल त्या प्रत्येक तासाबद्दल किंवा तासाच्या भागाबद्दल नियोक्ता, या अधिनियमाखाली ठरविलेला दर किंवा समुचित शासनाच्या त्या त्या काळी अंमलात असणाऱ्या कोणत्याही कायद्याखाली ठरविलेला अतिकालिक कामाच्या वेतनाचा दर यांपैकी जो अधिक असेल त्या दराने त्याला वेतन देईल.

(२) जेथे [1]['कारखाना अधिनियम, १९४८' (१९४८ चा ६३)—कलम ५९] याचे उपबंध लागू होत असतील अशा कोणत्याही प्रकरणी उक्त उपबंधांच्या प्रवर्तनास या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे बाध येणार नाही.

**सर्वसाधारण कामाच्या दिवसाच्या वेळेपेक्षा कमी वेळ काम करणाऱ्या कामगारांचे वेतन.**

१५. ज्याच्या वेतनाचा किमान दर या अधिनियमाखाली दिवसागणिक ठरविण्यात आला असेल असा एखादा कामगार ज्या कोणत्याही दिवशी तो कामावर आला होता त्या दिवशी सर्वसाधारण कामाचा दिवस भरण्यास आवश्यक तितक्या तासांपेक्षा कमी वेळ काम करील तेव्हा, त्या कामगारास यात यापुढे अन्यथा उपबंधित करण्यात आले असेल तेवढे खेरीजकरून एरव्ही, जणू काही त्याने सर्वसाधारण कामाच्या संपूर्ण दिवसाइतके काम केले असावे त्याप्रमाणे त्याने त्या दिवशी केलेल्या कामाच्या संबंधात वेतन मिळण्याचा हक्क असेल :

परंतु असे असले तरी,—

(एक) ज्या कोणत्याही बाबतीत, नियोक्ता त्या कामगाराला काम पुरवू न शकल्यामुळे नव्हे, तर त्याच्या काम करण्याच्या अनिच्छेमुळे त्याच्याकडून काम झाले नसेल त्याबाबतीत, आणि

(दोन) विहित करण्यात येईल अशा इतर बाबतीत व परिस्थितीत,

त्या कामगाराला संपूर्ण सर्वसाधारण कामाच्या दिवसाबद्दल वेतन मिळण्याचा हक्क असणार नाही.

**दोन किंवा अधिक वर्गांच्या कामाबद्दल वेतन.**

१६. ज्यापैकी प्रत्येक वर्गाच्या कामाला वेतनाचा निरनिराळा किमान दर लागू होतो अशा दोन किंवा अधिक वर्गाचे काम एखादा कामगार करील तेव्हा, अशा प्रत्येक वर्गाचे काम करण्यासाठी लागलेल्या त्या त्या अवधीच्या संबंधात नियोक्ता अशा कामगाराला अशा प्रत्येक वर्गाच्या कामाच्या बाबतीत अंमलात असलेल्या किमान वेतन दरांपेक्षा कमी नसेल अशा दराने वेतन देईल.

**उक्त्या कामासाठी किमान वेळेवारी दराने वेतन.**

१७. ज्यासाठी या अधिनियमाखाली किमान कामावारी दर ठरविण्यात आला नसून, किमान वेळेवारी दर ठरविण्यात आला आहे अशा उक्त्या कामावर एखादा कामगार नेमलेला असेल तेव्हा, नियोक्ता अशा कामगाराला किमान वेळेवारी दरापेक्षा कमी नाही इतक्या दराने वेतन देईल.

**नोंदपुस्तके व अभिलेख ठेवणे.**

१८. (१) प्रत्येक नियोक्ता त्याने कामावर लावलेले कामगार, त्यांनी केलेले काम, त्यांना देण्यात येणारे वेतन, कामगारांनी दिलेल्या पावत्या यासंबंधीचा तपशील आणि विहित करण्यात येईल असा इतर तपशील देणारी आणि तशा विहित नमुन्यात असणारी नोंदपुस्तके व अभिलेख ठेवील.

(२) ज्या कारखान्यात, कार्यशाळेत किंवा अन्य जागी अनुसूचित कामधंद्यामध्ये कामगार कामावर लावण्यात आलेले असतील तेथे किंवा बाहेरील कामगारांच्या बाबतीत त्यांना बाहेरील काम देण्यासाठी ज्या कारखान्याचा, कार्यशाळेचा किंवा अन्य जागेचा उपयोग करण्यात येईल तेथे, नियोक्ता विहित करण्यात आलेला तपशील देणाऱ्या विहित केलेल्या नमुन्यातील नोटिसा विहित करण्यात येईल अशा रीतीने प्रदर्शित करील.

---

१. १९५४ चा अधिनियम क्रमांक २६, कलम ४ द्वारे "कारखाना अधिनियम, १९३४ (१९३४ चा २५) कलम ४७" याऐवजी हा मजकूर दाखल केला.

१. सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम ४ द्वारे हा मजकूर समाविष्ट केला.

(३) या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे समुचित शासनाला, ज्या कोणत्याही अनुसूचित कामधंद्याच्या संबंधात वेतनाचे किमान दर ठरविण्यात आलेले असतील त्या कामधंद्यात कामावर लावलेल्या कामगारांना वेतनपुस्तिका किंवा वेतनपत्रिका देण्याचा उपबंध करता येईल आणि नियोक्त्याने किंवा त्याच्या अभिकर्त्याने अशा वेतनपुस्तिकांमध्ये किंवा वेतनपत्रिकांमध्ये कशा रीतीने नोंदी करून त्या अधिप्रमाणित केल्या पाहिजेत ते विहित करता येईल.

**(३) या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे समुचित शासनाला ज्या कोणत्याही अनुसूचित काम धंद्याच्या संबंधात वेतनाचे किमान दर ठरविण्यात आलेले असतील त्या कामधंद्यात कामावर लावलेल्या कामगारांना वेतनपुस्तिका किंवा वेतनपत्रिका [1][आणि उपस्थिति-पत्रिका] देण्याचा उपबंध करता येईल आणि नियोक्त्याने किंवा त्याच्या अभिकर्त्याने अशा वेतनपुस्तिकांमध्ये किंवा वेतनपत्रिकांमध्ये [1][आणि उपस्थिति-पत्रिकांमध्ये] कशा रीतीने नोंदी करून त्या अधिप्रमाणित केल्या पाहिजेत ते विहित करता येईल.**

निरीक्षक. १९. (१) शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे समुचित शासनाला आपणांस योग्य वाटतील अशा व्यक्ती या अधिनियमांच्या प्रयोजनार्थ निरीक्षक म्हणून नियुक्त करता येतील आणि त्यांनी कोणत्या स्थानिक सीमांमध्ये आपले कार्याधिकार वापरावेत ते ठरवून देता येईल.

(२) याबाबतीत केलेल्या कोणत्याही नियमांच्या अधीनतेने, निरीक्षक, ज्या स्थानिक सीमांमध्ये त्यास नियुक्त केलेले असेल त्या स्थानिक सीमांमध्ये —

(क) सर्व वाजवी वेळी, सहायक म्हणून (कोणी असल्यास) आपणांस योग्य वाटतील अशा शासकीय किंवा स्थानिक किंवा इतर सार्वजनिक प्राधिकरणाच्या नोकरीत असलेल्या व्यक्तींना घेऊन, ज्या कोणत्याही अनुसूचित कामधंद्याच्या संबंधात या अधिनियमाखाली वेतनाचे किमान दर ठरविण्यात आलेले असतील त्या कामधंद्यातील कामगार ज्या जागेत किंवा ठिकाणी कामावर लावण्यात आले असतील किंवा त्या कामधंद्यातील काम ज्या जागेत किंवा ठिकाणी बाहेरील कामगारांस देण्यात येत असेल त्या जागेत किंवा ठिकाणी जे कोणतेही नोंदपुस्तक, जो वेतनाचा अभिलेख ठेवणे किंवा ज्या नोटिसा लावणे या अधिनियमाद्वारे अथवा त्या अन्वये केलेल्या नियमांद्वारे किंवा त्यांखाली आवश्यक केलेले असेल त्यांची तपासणी करण्याच्या प्रयोजनार्थ प्रवेश करू शकेल आणि तपासणीसाठी ती सादर करण्यास भाग पाडू शकेल;

(ख) अशा कोणत्याही परिवास्तूमध्ये किंवा त्या ठिकाणी त्याला जर कोणतीही व्यक्ती आढळली आणि ती म्हणजे त्या परिवास्तूमध्ये किंवा त्या ठिकाणी कामावर लावलेला कामगार आहे किंवा बाहेरून काम करून आणण्यासाठी ज्याला त्या परिवास्तूमध्ये किंवा त्या ठिकाणी काम देण्यात येते असा कामगार आहे असे समजण्यास उक्त निरीक्षकास वाजवी कारण असेल तर, तो त्या व्यक्तीची तपासणी करू शकेल;

(ग) बाहेरून करून आणण्यासाठी काम देणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला व बाहेरून काम करून आणणाऱ्या कोणत्याही कामगाराला आपल्या शक्तीनुसार जी माहिती देणे शक्य आहे अशी, ज्यांच्या-साठी बाहेरचे काम दिले व ज्यांच्याकडून ते स्वीकारले त्या व्यक्तींची नावे व पत्ते यांच्या संबंधातील व त्या कामाबद्दल द्यावयाचे पैसे यांच्या संबंधातील कोणतीही माहिती देण्यास फर्मावू शकेल;

[1][(घ) नियोक्त्याने या अधिनियमाखाली जो कोणताही अपराध केला आहे असे समजण्यास त्यास कारण असेल त्याच्याशी जे नोंदपुस्तक, वेतनाचा अभिलेख किंवा नोटिसा किंवा त्यांचे भाग संबद्ध आहेत असे त्याला वाटेल ते तो सक्तीने ताब्यात घेऊ शकेल किंवा त्याच्या नकला काढून घेऊ शकेल; आणि]

(ङ) विहित करण्यात येतील अशा अन्य शक्ती वापरू शकेल.

(३) प्रत्येक निरीक्षक हा 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) यात अभिप्रेत असल्याप्रमाणे लोकसेवक असल्याचे समजण्यात येईल.

[1][(४) पोटकलम (२) खाली निरीक्षकाने कोणताही दस्तऐवज किंवा वस्तू सादर करण्यासाठी किंवा कोणतीही माहिती देण्यासाठी ज्या व्यक्तीस आदेश दिला असेल ती व्यक्ती तसे करण्यास 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५), कलम १७५ आणि कलम १७६ यांच्या अर्थानुसार विधित: बद्ध असल्याचे मानले जाईल.]

मागण्या. २०. (१) शासकीय राजपत्रातील अधिसूचने-द्वारे समुचित शासनाला [2][कोणताही श्रमिक भरपाई आयुक्त किंवा कोणत्याही प्रदेशाचा कामगार आयुक्त म्हणून कार्याधिकार वापरणारा केंद्र शासनाचा

**२०. (१) शासकीय राजपत्रातील अधि-सूचनेद्वारे समुचित शासनाला कोणताही श्रमिक भरपाई आयुक्त किंवा कोणत्याही प्रदेशाचा कामगार**

---

१. १९५७ चा अधिनियम क्रमांक ३०, कलम ११ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

२. वरील अधिनियमाच्या कलम १२ द्वारे "कोणताही श्रमिकभरपाई आयुक्त किंवा" याऐवजी दाखल केले.

**१. सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम ५ द्वारे हे शब्द समाविष्ट करण्यात आले.**

कोणताही अधिकारी, किंवा कामगार आयुक्ताच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेला राज्य शासनाचा कोणताही अधिकारी किंवा कोणताही ] दिवाणी न्यायालयाचा न्यायाधीश म्हणून अगर वैतनिक दंडाधिकारी म्हणून अनुभव असलेला अन्य अधिकारी यांची, कोणत्याही विनिर्दिष्ट केलेल्या प्रदेशापुरता त्या प्रदेशात कामावर लावलेल्या किंवा वेतन मिळत असलेल्या कामगारास किमान वेतन दरापेक्षा कमी दराने वेतन दिल्यामुळे [२][ किंवा कलम १३-पोटकलम (१) चा खंड (ख) किंवा खंड (ग) याखाली विश्रांतीच्या दिवसांचे किंवा अशा दिवशी केलेल्या कामाबद्दलचे पारिश्रमिक देण्याच्या किंवा कलम १४ खाली अतिकालिक कामाच्या दराने वेतन देण्याच्या संबंधात, ] उद्भवणाऱ्या सर्व मागण्यांची सुनावणी करून निर्णय देणारा प्राधिकारी म्हणून नियुक्ती करता येईल.

आयुक्त म्हणून कार्याधिकार वापरणारा केंद्र शासनाचा कोणताही अधिकारी किंवा कामगार आयुक्ताच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेला राज्य शासनाचा कोणताही अधिकारी किंवा कोणताही दिवाणी न्यायालयाचा न्यायाधीश म्हणून अगर वैतनिक [१][न्याय दंडाधिकारी] म्हणून अनुभव असलेला अन्य कोणताही अधिकारी यांची, कोणत्याही विनिर्दिष्ट केलेल्या प्रदेशापुरता त्या प्रदेशात कामावर लावलेल्या किंवा वेतन मिळत असलेल्या कामगारांस किमान वेतन दरापेक्षा कमी दराने वेतन दिल्यामुळे [२][ किंवा कलम १२, पोट-कलम (१) अन्वये विहित करण्यात आलेल्या वेळेच्या आत न देण्यात आलेल्या वेतनाच्या संबंधात ] किंवा कलम १३-पोटकलम (१) चा खंड (ख) किंवा खंड (ग) याखाली विश्रांतीच्या दिवसांचे किंवा अशा दिवशी केलेल्या कामाबद्दलचे पारिश्रमिक देण्याच्या किंवा कलम १४ खाली अतिकालिक कामाच्या दराने वेतन देण्याच्या संबंधात, उद्भवणाऱ्या सर्व मागण्यांची सुनावणी करून निर्णय देणारा प्राधिकारी म्हणून नियुक्ती करता येईल :

[३][ परंतु, राज्य शासनास, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, त्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही क्षेत्रामध्ये शेतीच्या कामावर असलेल्या किंवा तेथे मोलमजुरी करणाऱ्या कामगारांच्या सर्व मागण्यांची सुनावणी करून त्यावर निर्णय देणारे प्राधिकरण म्हणून कोणत्याही गट विकास अधिकाऱ्यांची, तहसीलदाराची, अपर तहसीलदाराची किंवा नायब तहसीलदाराची याप्रमाणे विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रापुरती नियुक्ती करता येईल.

स्पष्टीकरण.— या परंतुकाच्या प्रयोजनासाठी, "गट विकास अधिकारी" या शब्दप्रयोगाचा अर्थ 'महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१' यामध्ये त्याला नेमून दिलेल्या अर्थाप्रमाणे असेल. ]

(२) [२][जेव्हा एखाद्या कामगाराची पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या स्वरुपाची कोणतीही मागणी असेल तेव्हा], खुद्द त्या कामगारास किंवा त्याच्या वतीने काम चालविण्याचा ज्याला लेखी प्राधिकार देण्यात आला आहे अशा कोणत्याही विधि व्यवसायीस किंवा नोंदलेल्या व्यवसाय संघाच्या अशा कोणत्याही पदाधिकाऱ्यास किंवा कोणत्याही निरीक्षकास किंवा पोटकलम (१) खाली नियुक्त केलेल्या प्राधिकाऱ्याच्या परवानगीने काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस पोटकलम (३) खालील निदेशासाठी अशा प्राधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल :

परंतु, असा प्रत्येक अर्ज किमान वेतन [१][ किंवा अन्य रक्कम ] ज्या दिनांकास प्रदेय झाली त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत सादर करण्यात आला पाहिजे :

परंतु, आणखी असे की, अशा मुदतीच्या आत अर्ज न करण्यास उक्त अर्जदारास पुरेसे कारण होते अशी अर्जदाराने उक्त प्राधिकाऱ्याची खात्री पटविल्यास कोणताही अर्ज उक्त सहा महिन्यांच्या मुदतीनंतर दाखल करून घेता येईल.

---

१. १९५७ चा अधिनियम क्रमांक ३०, कलम १२ द्वारे समाविष्ट केले.

२. वरील अधिनियमाच्या कलम १२ द्वारे विवक्षित शब्दांऐवजी घातले.

१. मुंबईचा न्यायदान विषयक व कार्य चालन विषयककार्ये विभाजन करण्याबाबत (पुरवणी) अधिनियम १९५४ द्वारे समाविष्ट केला.

२. १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम ३, कलम ६ द्वारे समाविष्ट केले.

३. महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग चार, दिनांक १५ जुलै १९७६, पृष्ठे २२८-२२९ वर प्रसिद्ध केलेला किमान वेतन (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९७५, द्वारे समाविष्ट केला. (१ फेब्रुवारी १९७७ रोजी व तेव्हापासून).

[१] [ (३) जेव्हा पोट कलम (२) खालील कोणताही अर्ज दाखल करून घेण्यात आला असेल तेव्हा, उक्त प्राधिकरण हे अर्जदार आणि नियोक्ता यांचे म्हणणे ऐकून घेईल किंवा त्यांना आपले म्हणणे मांडण्याची संधी देईल आणि त्यास आणखी कोणतीही चौकशी करणे आवश्यक वाटल्यास ती केल्यानंतर ते, या अधिनियमाखाली नियोक्ता ज्या कोणत्याही इतर शास्तीस पात्र असेल त्याला बाध न येता, पुढीलप्रमाणे निदेश देऊ शकेल :—

(एक) वेतनाच्या किमान दरापेक्षा कमी दराने वेतन दिल्यामुळे उद्‌भवलेल्या मागणीच्या बाबतीत, कामगारास प्रदेय असलेली किमान वेतनाची रक्कम प्रत्यक्षात दिलेल्या रकमेपेक्षा जितक्या रकमेने जास्त असेल तितकी रक्कम व तसेच उक्त जादा रकमेच्या दहा पटींपेक्षा अधिक नाही अशी उक्त प्राधिकरणास योग्य वाटेल तेवढी भरपाईची रक्कम त्या कामगारास देण्यात यावी;

(दोन) अन्य कोणत्याही बाबतीत कामगारास देय असलेली रक्कम व तसेच दहा रुपयांहून अधिक नाही अशी प्राधिकरणास योग्य वाटेल तेवढी भरपाईची रक्कम कामगारास देण्यात यावी;

आणि ज्या बाबतीत अर्ज निकालात काढण्यापूर्वीच नियोक्त्याने कामगारास अशी जादा किंवा देय रक्कम दिली असेल त्या बाबतीत ते प्राधिकरण अशी भरपाईची रक्कम देण्याबद्दलचा निदेश देऊ शकेल. ]

(४) एखादा अर्ज द्वेषबुद्धीने किंवा त्रास देण्याच्या हेतूने करण्यात आला होता अशी, या कलमाखाली त्या अर्जाची सुनावणी करणाऱ्या प्राधिकरणाची खात्री झाल्यास, तो अर्ज सादर करणाऱ्या व्यक्तीकडून नियोक्त्यास पन्नास रुपयांपेक्षा अधिक नाही अशी रक्कम शास्ती म्हणून दिली जावी असा निदेश ते देऊ शकेल.

(५) या कलमाखाली जी रक्कम देण्याबाबत निदेश देण्यात आला असेल अशी कोणतीही रक्कम—

(क) जर ते प्राधिकरण म्हणजे दंडाधिकारी असेल तर, तो जणू काही त्या प्राधिकरणाने दंडाधिकारी या नात्याने केलेला द्रव्य दंड असावा त्याप्रमाणे त्या प्राधिकरणाला; किंवा

(ख) जर ते प्राधिकरण म्हणजे दंडाधिकारी नसेल तर, ते प्राधिकरण ज्याच्याकडे याबाबत अर्ज करील अशा कोणत्याही दंडाधिकाऱ्याने जणू काही तो द्रव्य दंड केलेला असावा त्याप्रमाणे अशा दंडाधिकाऱ्याला वसूल करता येईल.

(६) त्या प्राधिकरणाने या कलमाखाली दिलेला प्रत्येक निदेश अंतिम असेल.

(७) पोटकलम (१) खाली नियुक्त केलेल्या प्रत्येक प्राधिकरणास साक्षीपुरावा घेण्यासाठी व साक्षीदारांस हजर राहण्यास भाग पाडण्यासाठी आणि दस्तऐवज हजर करण्याची सक्ती करण्यासाठी 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५) याखाली दिवाणी न्यायालयाला असलेल्या सर्व शक्ती असतील आणि असे प्रत्येक प्राधिकरण हे 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८' (१८९८ चा ५) याचे कलम १९५ व ३५ वे प्रकरण यांच्या सर्व प्रयोजनांकरता दिवाणी न्यायालय असल्याचे मानले जाईल.

**अनेक कामगारांच्या संबंधात एकच अर्ज करणे.**

२१. (१) ज्या अनुसूचित कामधंद्यांच्या संबंधात वेतनाचे किमान दर ठरविण्यात आलेले असतील त्या कामधंद्यात कामावर लावलेल्या कितीही कामगारांच्या वतीने किंवा त्यांच्या संबंधात कलम २० खाली [२] [ विहित करण्यात येतील अशा नियमांच्या अधीनतेने, एकच अर्ज ] सादर करता येईल आणि अशा बाबतीत कलम २० च्या पोटकलम (३) खाली जितकी कमाल भरपाई देववता येईल तितकी रक्कम अशा जादा रकमा मिळून होणाऱ्या एकूण रकमेच्या दहा पटींहून [३] [ किंवा, प्रकरणपरत्वे, दरडोई दहा रुपये ] याप्रमाणे होणाऱ्या रकमेहून अधिक असणार नाही.

(२) ज्या अनुसूचित कामधंद्याच्या संबंधात वेतनाचे किमान दर ठरविण्यात आलेले असतील अशा कामधंद्यातील कामगारांच्या संबंधात कलम २० खाली प्राधिकरणाकडे सादर केलेले व अनिर्णीत असलेले कितीही वेगवेगळे अर्ज असले तरी ते म्हणजे या कलमाच्या पोटकलम (१) खाली सादर केलेला एकच अर्ज असावा त्याप्रमाणे, प्राधिकरणाला त्यांच्यावर कार्यवाही करता येईल आणि तदनुसार त्या पोटकलमाचे उपबंध त्यांना लागू होतील.

**न्यायालय शुल्क देण्याची जबाबदारी**

[१] [ **२१क. (१) कलम २० खालील कोणत्याही कार्यवाहीत, अर्जदार अशा कार्यवाहीच्या संबंधात कोणतीही न्यायालय फी (आदेशिका बजावण्यासाठी द्यावयाची फी खेरीज करून) देण्यास पात्र असणार नाही :**

---

१. १९५७ चा अधिनियम क्रमांक ३०, कलम १२ द्वारे पोटकलम (३) ऐवजी घातले.

२. वरील अधिनियमाच्या कलम १३ द्वारे "एकच अर्ज" या ऐवजी घातले.

३. वरील अधिनियमाच्या कलम १३ द्वारे समाविष्ट केले.

१. **किमान वेतन (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९६० (१९६१ चा महाराष्ट्र १०) द्वारे नवीन कलम समाविष्ट केले.**

परंतु निरीक्षकाने असा अर्ज सादर केला असेल तर, आदेशिका बजावण्याबद्दलची अशी फी सुद्धा तो देण्यास पात्र असणार नाही.

(२) जर अशा कार्यवाहीत अर्जदाराच्या बाजूने निकाल लागला तर, अर्जाची सुनावणी करणारे प्राधिकरण, पोट-कलम (१) मधील उपबंध नसता तर अर्जदाराला जी न्यायालय फी भरावी लागली असती त्या न्यायालय फीची रक्कम हिशेब करून काढील आणि ती रक्कम राज्य शासनाला देण्याबाबत नियोक्त्याला किंवा कलम १२ अन्वये वेतन देण्यास जबाबदार असलेल्या अन्य व्यक्तीस फर्मावील. ही रक्कम, वसूल करण्याच्या इतर कोणत्याही रीतीस बाध न येता, जमीन-महसूलाची थकबाकी म्हणून वसूल करता येण्यासारखी असेल.]

[१][२२. जो कोणताही नियोक्ता—

(क) कोणत्याही कामगारास, त्याच्या कामाच्या वर्गाकरिता ठरविलेल्या वेतनाच्या किमान दरांहून कमी दरांनी किंवा या अधिनियमाच्या उपबंधांखाली उक्त कामगाराला देय असलेल्या रकमेपेक्षा कमी वेतन देईल; किंवा

(ख) कलम १३ खाली केलेला कोणताही नियम किंवा दिलेला आदेश यांचे व्यतिक्रमण करील,

**विवक्षित अपराधाबद्दल शिक्षा.**

२२. जो कोणताही नियोक्ता—

(क) कोणत्याही कामगारास, त्याच्या कामाच्या वर्गाकरिता ठरविलेल्या वेतनाच्या किमान दरांहून कमी दरांनी किंवा या अधिनियमाच्या उपबंधांखाली उक्त कामगाराला देय असलेल्या रकमेपेक्षा कमी वेतन देईल [१][किंवा कलम १२, पोटकलम (१) खाली विहित करण्यात आलेल्या मुदतीच्या आत वेतन देण्यात कसूर करील]; किंवा.

तो, सहा महिनेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल :

परंतु, या कलमाखालील अपराधाबद्दल कोणताही द्रव्यदंड बसवताना न्यायालय कलम २० खाली चालवलेल्या कोणत्याही कार्यवाहीत आरोपीविरुद्ध पूर्वीच जी कोणतीही भरपाई देवविण्याचा निवाडा झाला असेल त्या भरपाईची रक्कम विचारात घेईल.

**निरीक्षकास अडथळा केल्याबद्दल शिक्षा.**

[२][२२-१क. या अधिनियमान्वये किंवा त्याखाली निरीक्षकास देण्यात आलेल्या कोणत्याही अधिकाराचा तो वापर करीत असताना जी कोणतीही व्यक्ती त्याला जाणूनबुजून अटकाव करील किंवा या अधिनियमास अनुसरून त्याच्या अभिरक्षेत ठेवण्यात आलेली असून जी त्यास या अधिनियमान्वये किंवा त्याखाली कराव्या लागतात अशी कोणतीही नोंद-पुस्तके, कागदपत्रे किंवा इतर दस्तऐवज निरीक्षकाने मागणी केली असता हजर करण्यात कसूर करील त्या व्यक्तीला दोषसिद्धी अंती पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतका द्रव्यदंड होईल.]

**अन्य अपराधांबद्दलच्या शिक्षेसाठी सर्वसाधारण उपबंध.**

२२क. जो कोणताही नियोक्ता या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाच्या अथवा दिलेल्या आदेशाच्या कोणत्याही उपबंधाचे व्यतिक्रमण करील तो या अधिनियमाखाली त्या व्यतिक्रमणाबद्दल अन्य कोणत्याही शास्तीचा उपबंध करण्यात आला नसेल तर, पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र असेल.

**अपराधांची दखल घेणे.**

२२ख. (१) कोणतेही न्यायालय—

(क) कलम २२-खंड (क) खालील अपराधांच्या बाबतीत, अशा अपराधाला घटकभूत असलेल्या तथ्यांसंबंधी कलम २० खाली अर्ज सादर करण्यात येऊन तो संपूर्णत: किंवा अंशत: मान्य झालेला आहे आणि समुचित शासनाने किंवा या संबंधात त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने तक्रार करण्यास मंजुरी दिलेली आहे असे असल्याशिवाय ;

---

१. १९५७ चा अधिनियम क्रमांक ३०—कलम १४ द्वारे मूळ कलम २२ ऐवजी घातले.

१. सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम ७ द्वारे हे शब्द, कंस व मजकूर समाविष्ट केला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ८ द्वारे हे कलम समाविष्ट केले.

(ख) कलम २२, खंड (ख) खालील किंवा कलम २२क खालील अपराधांच्या बाबतीत, निरीक्षकाकडून किंवा त्याच्या मंजुरीनिशी तक्रार आल्याखेरीज,

त्या अपराधाची दखल घेणार नाही.

(२) कोणतेही न्यायालय—
(क) कलम २२ खंड (क) किंवा खंड (ख) खालील अपराधाच्या बाबतीत, या कलमाखाली मंजुरी देण्यात आल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत त्याबद्दल तक्रार देण्यात आली नाही तर,
(ख) कलम २२ क खालील अपराधाच्या बाबतीत, अपराध ज्या दिनांकास घडल्याचे अभिकथन करण्यात आले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत त्याबद्दल तक्रार देण्यात आली नाही तर,

त्या अपराधाची दखल घेणार नाही.

**(२) कोणतेही न्यायालय—**
**(क) कलम २२, खंड (क) किंवा खंड (ख) खालील अपराधांच्या बाबतीत, या कलमाखाली मंजुरी देण्यात आल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत त्याबद्दल तक्रार देण्यात आली नाही तर ;**
[1][(ख) कलम २२-क खालील अपराधांच्या बाबतीत निरीक्षकाला त्या अपराधाची माहिती झाली त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत त्याबद्दल तक्रार देण्यात आली नाही तर ;]

**कंपन्यांनी केलेले अपराध.** २२ग. (१) या अधिनियमाखाली अपराध करणारी व्यक्ती एखादी कंपनी असेल तर, अपराध घडला त्यावेळी त्या कंपनीच्या कामकाजचालनाबद्दल जी व्यक्ती कंपनीची प्रभारी होती आणि त्याबाबत कंपनीस जबाबदार होती अशी प्रत्येक व्यक्ती व तसेच ती कंपनी त्या अपराधाबाबत दोषी असल्याचे मानले जाईल आणि त्यांच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व त्याप्रमाणे शिक्षा होण्यास त्या पात्र असतील :

परंतु अपराध आपल्या नकळत घडला किंवा असा अपराध घडू नये यासाठी आपण सर्वप्रकारे यथायोग्य तत्परता दाखवली होती असे कोणत्याही व्यक्तीने शाबीत केले तर, या पोटकलमातील कोणत्याही गोष्टीमुळे या अधिनियमात उपबंधित केल्याप्रमाणे कोणतीही शिक्षा होण्यास ती व्यक्ती पात्र असणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा या अधिनियमाखालील अपराध एखाद्या कंपनीने केला असेल आणि असा अपराध हा त्या कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य कोणताही अधिकारी याच्या संमतीने किंवा मूकानुमतीने करण्यात आला आहे किंवा त्या अपराधाचा त्याने केलेल्या कोणत्याही प्रकारच्या हलगर्जीपणाशी कारणसंबंध जोडता येण्यासारखा आहे असे शाबीत झाले तर, अशा कंपनीचा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी हा सुद्धा त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानले जाईल आणि त्याच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व तदनुसार शिक्षा होण्यास तो पात्र असेल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ—

(क) "कंपनी" याचा अर्थ, कोणताही निगम निकाय असा आहे आणि त्यामध्ये पेढी किंवा अन्य व्यक्तिसंघ समाविष्ट आहे ; आणि

(ख) "संचालक" याचा पेढीच्या संबंधातील अर्थ, पेढीतील भागीदार असा आहे.

**कामगारांना प्रदेय असलेल्या अवितरित रकमांचे प्रदान.** २२घ. या अधिनियमाखाली कामगाराच्या किमान वेतनाची रक्कम म्हणून अथवा हा अधिनियम किंवा त्याखाली केलेला कोणताही नियम किंवा आदेश याखाली अन्यथा नियोक्त्याने कामगारास द्यावयाच्या सर्व रकमा, त्या देण्यापूर्वीच त्या कामगाराचा मृत्यू झाल्यामुळे किंवा त्याचा ठावठिकाणा माहीत नसल्यामुळे त्यास देता आल्या नसतील किंवा देणे शक्य नसेल तर, विहित प्राधिकरणाकडे जमा केल्या जातील आणि विहित प्राधिकरण याप्रमाणे जमा केलेल्या पैशांची विहित करण्यात येईल त्या रीतीने व्यवस्था लावील.

**नियोक्त्याची शासनाजवळील मत्ता जप्त करण्यापासून संरक्षण.** २२ङ. समुचित शासनाशी केलेल्या संविदेचे योग्य रीतीने पालन व्हावे म्हणून त्या शासनाजवळ नियोक्त्याने जमा केलेली कोणतीही रक्कम आणि अशा संविदेच्या संबंधात त्या शासनाकडून नियोक्त्यास प्रदेय असलेली अन्य कोणतीही रक्कम नियोक्त्यावर उपरोक्त संविदेच्या संबंधात कामावर लावलेल्या कोणत्याही कामगाराप्रत देय म्हणून आलेले कोणतेही ऋण किंवा दायित्व सोडून अन्य जे कोणतेही ऋण किंवा दायित्व नियोक्त्यावर आलेले असेल त्याच्या संबंधात कोणत्याही न्यायालयाने दिलेल्या कोणत्याही हुकूमनाम्याखाली किंवा आदेशाखाली जप्त होण्यास पात्र असणार नाही.

**'वेतन प्रदान अधिनियम, १९३६' अनुसूचित कामधंद्यांना लागू असणे.** २२च. (१) 'वेतन प्रदान अधिनियम, १९३६' (१९३६ चा ४) यात काहीही अंतर्भूत असले तरी, समुचित शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे असा निदेश देऊ शकेल की, पोटकलम (२) च्या उपबंधाच्या अधीनतेने, उक्त अधिनियमाच्या उपबंधांपैकी सर्व किंवा कोणतेही उपबंध, अधिसूचनेत जी कोणतीही आपरिवर्तने उल्लेखिण्यात येतील त्या आपरिवर्तनांसह, तीत उल्लेखिण्यात येतील त्या अनुसूचित कामधंद्यांमध्ये लावलेल्या कामगारांना द्यावयाच्या वेतनाबाबत लागू होतील.

---

१. १९५७ च्या किमान वेतन (विशोधन) अधिनियमाद्वारे मूळ कलमाऐवजी नवीन कलम घालण्यात आले.

**१. सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ४ द्वारे मूळ पोटकलमाऐवजी दाखल केले.**

(२) जेव्हा पोटकलम (१) खालील कोणत्याही अनुसूचित कामधंद्यातील कामगारांना द्यावयाच्या वेतनास उक्त अधिनियमाच्या उपबंधांपैकी सर्व किंवा कोणतेही उपबंध लागू करण्यात आले असतील तेव्हा, या अधिनियमाखाली नियुक्त केलेला निरीक्षक हा अशा रीतीने लागू केलेल्या उपबंधांची आपल्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनार्थ नियुक्त केलेला निरीक्षक आहे असे मानले जाईल. ]

२३. या अधिनियमाविरुद्ध अपराध केल्याचा आरोप एखाद्या नियोक्त्यावर करण्यात आला असेल त्याबाबतीत नियोक्त्याने रीतसर तक्रार केली असता, जी व्यक्ती प्रत्यक्षात अपराधी आहे असा त्याचा आरोप असेल अशा दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीस अपराधाच्या सुनावणीसाठी नेमलेल्या वेळी न्यायालयापुढे आणवण्याचा नियोक्त्याला हक्क असेल, आणि अपराध घडला हे सिद्ध झाल्यानंतर अशा नियोक्त्याने जर— विवक्षित प्रकरणीं नियोक्त्याला दायित्वापासून सूट देणे.

(क) या अधिनियमाची अंमलबजावणी करण्यासाठी त्याने यथायोग्य तत्परता दाखवली आहे; आणि

(ख) अशा दुसऱ्या व्यक्तीने प्रस्तुत अपराध केला असून आपणास ते माहीत नव्हते व आपली त्याला संमती किंवा मूकानुमती नव्हती,

अशी न्यायालयाची खात्री करून दिली तर, ती दुसरी व्यक्ती अपराधाबद्दल दोषी असल्याचे ठरविण्यात येईल आणि ती जणू काही नियोक्ता असावी त्याप्रमाणे तशाच शिक्षेस पात्र होईल आणि नियोक्त्यास विनादोषारोप सोडून देण्यात येईल :

परंतु, वर सांगितल्याप्रमाणे शाबीत करताना नियोक्त्याची शपथेवर तपासणी करता येईल आणि अशा नियोक्त्याने किंवा त्याचा कोणी साक्षीदार असल्यास त्याने दिलेला साक्षीपुरावा, जी व्यक्ती प्रत्यक्ष अपराधी असल्याचा नियोक्त्याचा आरोप असेल त्या व्यक्तीकडून किंवा तिच्या वतीने व फिर्यादीपक्षाकडून त्याबाबत उलटतपासणी होण्यास पात्र असेल.

२४. जर वेतनाच्या वसुलीबाबतच्या कोणत्याही दाव्यात मागितलेली रक्कम,— दाव्यास आडकाठी.

(क) वादीने किंवा वादीच्या वतीने कलम २० खाली सादर केलेल्या अर्जाचा विषय असेल, किंवा

(ख) त्या कलमाखाली वादीच्या बाजूने दिलेल्या निदेशाचा विषय झाला असेल, किंवा

(ग) त्या कलमाखालील कोणत्याही कार्यवाहीमध्ये वादीप्रत देय नसल्याचा निकाल देण्यात आला असेल, किंवा

(घ) त्या कलमाखाली अर्ज करून वसूल करता आली असती अशा प्रकारची असेल;

तर कोणतेही न्यायालय तो दावा दाखल करून घेणार नाही.

२५. ज्याद्वारे एखाद्या कामगाराने वेतनाच्या किमान दरावरील आपला अधिकार किंवा या अधिनियमाखाली त्याला मिळणारा कोणताही विशेष हक्क किंवा सवलत सोडून दिली असेल किंवा कमी करून घेतली असेल अशी कोणतीही संविदा किंवा करार या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी केलेला असो किंवा नंतर केलेला असो—त्यामध्ये या अधिनियमाखाली ठरविलेले वेतनाचे किमान दर कमी करणे हे जेथवर अभिप्रेत असेल तेथवर तो रद्दबातल असेल. संविदेद्वारे दायित्वमुक्त करणे.

२६. (१) समुचित शासन ज्या कोणत्याही शर्ती लादणे त्यास योग्य वाटेल त्या शर्तींच्या अधीन-तेने असे निदेशित करू शकेल की, या अधिनियमाचे उपबंध निःसमर्थ झालेल्या कामगारांना द्यावयाच्या वेतनासंबंधाने लागू असणार नाहीत. सूट व अपवाद.

(२) समुचित शासन विशेष कारणांस्तव तसे करणे त्यास योग्य वाटल्यास शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे असे निदेशित करू शकेल की, ते विनिर्दिष्ट करील [१][ अशा शर्तींच्या अधीनतेने आणि ] अशा कालावधीपुरते हा अधिनियम किंवा त्याचे कोणतेही उपबंध एखाद्या अनुसूचित कामधंद्यात कामावर असलेल्या कामगारांच्या सर्व वर्गांना किंवा एखाद्या वर्गास किंवा जेथे एखादा अनुसूचित कामधंदा चालविण्यात येत असेल अशा एखाद्या स्थानिक भागास लागू होणार नाहीत.

[२][ (२क) सरसकट एखाद्या अनुसूचित कामधंद्यातील किंवा एखाद्या स्थानिक भागातल्या अनुसूचित कामधंद्यातील कोणत्याही कामगारवर्गाला [१][ किंवा एखाद्या अनुसूचित कामधंद्यातील कोणत्याही आस्थापनेला किंवा एखाद्या आस्थापनेच्या एखाद्या भागास ] लागू असलेल्या कामधंद्याच्या अटी व शर्ती लक्षात घेता, त्या वर्गाच्या ज्या कामगारांना [१][ किंवा अशा आस्थापनेतील किंवा कोणत्याही आस्थापनेच्या त्याभागातील ज्या कामगारांना ] यासंबंधात विहित करण्यात येईल अशा मर्यादेपेक्षा अधिक वेतन मिळते अशा कामगारांच्या

१. १९५७ चा अधिनियम क्रमांक ३०, कलम १५ द्वारे समाविष्ट केले.

२. १९५४ चा अधिनियम क्रमांक २६, कलम ५ द्वारे समाविष्ट केले.

संबंधात किमान वेतन ठरविणे, आवश्यक नाही असे समुचित शासनाचे मत असेल तर, त्यास शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे व काही शर्ती लादणे त्याला योग्य वाटल्यास त्यांच्या अधीनतेने असे निदेशित करता येईल की, या अधिनियमाचे उपबंध किंवा त्यांपैकी एखादा उपबंध अशा कामगारांच्या बाबतीत लागू होणार नाही.]

[1][परंतु, या पोटकलमाखालील राज्य शासनाचे अधिकार, राज्य शासनाच्या नियंत्रणाच्या अधीनतेने, कामगार आयुक्ताला वापरता येतील.]

(३) या अधिनियमातील कोणतीही गोष्ट एखाद्या नियोक्त्याने त्याच्याबरोबर रहात असलेल्या व त्याच्यावर अवलंबून असलेल्या त्याच्या कुटुंबियास द्यावयाच्या वेतनास लागू असणार नाही.

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमामध्ये 'नियोक्त्याचा कुटुंबीय' या संज्ञेत त्याचा किंवा तिचा विवाह-साथी किंवा अपत्य किंवा आई वा बाप किंवा भाऊ वा बहीण यांचा समावेश होतो असे मानले जाईल.

अनुसूचीत भर घालण्याची राज्य शासनाची शक्ती. २७. ज्या कोणत्याही कामधंद्याच्या संबंधाने या अधिनियमाखाली किमान वेतन दर ठरवले जावेत असे शासनाचे मत असेल तो कामधंदा अनुसूचीच्या दोहोंपैकी कोणत्याही भागात जादा दाखल करण्याचा आपला उद्देश असल्याबद्दल **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे कमीत कमी तीन महिन्यांची नोटीस देऊन नंतर समुचित शासनाला तो कामधंदा तशाच अधिसूचनेद्वारे त्यात दाखल करता येईल आणि त्यानंतर ती अनुसूची त्या राज्यास लागू होताना त्याप्रमाणे सुधारण्यात आल्याचे मानण्यात येईल.

केंद्र शासनाची निदेश देण्याची शक्ती. २८. केंद्र शासन एखाद्या राज्य शासनाला त्या राज्यात या अधिनियमाची अंमलबजावणी करण्या-संबंधाने निदेश देऊ शकेल.

केंद्र शासनाची नियम करण्याची शक्ती. २९. केंद्र शासनास, केंद्रीय सल्लागार मंडळाच्या सदस्यांना पदावधी, त्याचा कारभार चालविण्याच्या बाबतीत अनुसरावयाची कार्यपद्धती, मतदान पद्धती, सदस्यांमध्ये आकस्मिक रिक्त पदे भरावयाची रीत आणि कामकाज चालविण्यासाठी आवश्यक असलेली गणसंख्या विहित करणारे नियम **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे पूर्वप्रकाशनाच्या शर्तींच्या अधीनतेने करता येतील.

समुचित शासनाची नियम करण्याची शक्ती. ३०. (१) या अधिनियमांची उद्दिष्टे पार पाडण्यासाठी समुचित शासनास पूर्वप्रकाशनाच्या शर्तींच्या अधीनतेने **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेस बाध न येता, अशा नियमांद्वारे—

(क) समित्या, उपसमित्या [1] * * * व सल्लागार मंडळ यांच्या सदस्यांचा पदावधी त्यांचा कारभार चालविताना अनुसरावयाची कार्यपद्धती, मतदान पद्धती, सदस्यांमध्ये आकस्मिक रिक्त पदे भरण्याची रीत व कामकाज चालविण्यासाठी आवश्यक असलेली गणसंख्या विहित करता येईल;

(ख) समित्या, उपसमित्या [1] * * * * * व सल्लागार मंडळ यांच्यापुढील चौकशीच्या विषयासंबंधीच्या साक्षीदारांना बोलवावयाची व त्या विषयासंबंधीची कागदपत्रे हजर करण्याची रीत विहित करता येईल;

(ग) ऐनजिनसी द्यावयाच्या वेतनाची व सवलतीच्या दरांनी अत्यावश्यक वस्तूंचा पुरवठा करण्या-संबंधीच्या सवलतीची रोख रकमेच्या स्वरुपातील किंमत ठरविण्याची पद्धत विहित करता येईल;

(घ) वेतन द्यावयाची वेळ व शर्ती आणि त्यातून वजा करण्याची परवानगी असलेल्या रकमा विहित करता येतील;

(ङ) या अधिनियमाखाली ठरविलेल्या किमान वेतन दरांना पुरेशी प्रसिद्धी देण्याचा उपबंध करता येईल;

(च) दर सात दिवसांच्या मुदतीत एक दिवसांची विश्रांती देण्याचा आणि अशा दिवसाच्या बाबतीत पारिश्रमिक देण्याचा उपबंध करता येईल;

(छ) सर्वसाधारण कामाचा दिवस भरण्यासाठी आवश्यक असतील तितके कामाचे तास विहित करता येतील;

(छ) [2][**सर्वसाधारण 'कामाचा दिवस' किंवा आठवडा**] **भरण्यासाठी आवश्यक असतील तितके कामाचे तास विहित करता येतील ;**

---

१. १९५७ चा अधिनियम क्रमांक ३०, कलम १६ द्वारे "सल्लागार समित्या, सल्लागार उपसमित्या" हा मजकूर वगळण्यात आला.

**१. १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम ९ द्वारे हे परंतुक जादा घातले.**

**२. १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम १० द्वारे 'सर्वसाधारण कामाचा दिवस' या-ऐवजी हा मजकूर दाखल केला.**

(ज्) सर्वसाधारण कामाचा दिवस भरण्यासाठी आवश्यक असणाऱ्या तासांपेक्षा कमी अवधी-पुरते कामावर लावलेल्या कामगाराला कामाच्या कोणत्या प्रकरणी व कोणत्या परिस्थितीत सर्वसाधारण कामाच्या दिवसाचे पूर्ण वेतन मिळण्याचा हक्क असणार नाही ते विहित करता येईल;

(झ्) ठेवावयाची नोंदपुस्तके व अभिलेख यांचा नमुना आणि अशा नोंदपुस्तकांत व अभि-लेखांत दाखल करावयाचा तपशील विहित करता येईल;

(ञ्) वेतनपुस्तिका व वेतनपत्रिका देण्याचा उपबंध करता येईल आणि वेतनपुस्तिकांत व वेतन-पत्रिकांत नोंदी करण्याची व त्या अधिप्रमाणित करण्याची रीत विहित करता येईल;

**(ञ्) वेतनपुस्तिका [1][किंवा वेतनपत्रिका आणि उपस्थिति-पत्रिका] देण्याचा उपबंध करता येईल आणि वेतनपुस्तिकांत [1][किंवा वेतनपत्रिकांमध्ये आणि उपस्थिति-पत्रिकांमध्ये] नोंदी करण्याची व त्या अधि-प्रमाणित करण्याची रीत विहित करता येईल;**

(ट्) या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ निरीक्षकांच्या शक्ती विहित करता येतील;

(ठ्) कलम २० खालील कार्यवाहीमध्ये जो खर्च देववता येईल त्या खर्चाच्या प्रमाणाचे विनियमन करता येईल;

(ड्) कलम २० खालील कार्यवाहीच्या संबंधात द्यावयाच्या न्यायालय फीची रक्कम विहित करता येईल; आणि

(ढ्) विहित करावयाच्या किंवा विहित करता येईल अशा इतर कोणत्याही बाबीसाठी उपबंध करता येईल.

[1][३०क. या अधिनियमाखाली केंद्र शासनाने केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने किंवा दोन क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीत सत्रासीन असताना ठेवला जाईल आणि ज्या सत्रात तो याप्रमाणे ठेवला गेला ते किंवा त्याच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर त्या नियमांत कोणतेही आपरिवर्तन करण्या-बाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, तो नियम त्यानंतर अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही; तथापि अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.] केंद्र शासनाने केलेले नियम संसदेपुढे ठेवणे.

[2][३१. (क्) १ एप्रिल, १९५२ रोजी प्रारंभ होणाऱ्या व 'किमान वेतन (विशोधन) अधिनियम, १९५४' (१९५४ चा २६) याच्या प्रारंभदिनांकास संपणाऱ्या; किंवा विवक्षित किमान वेतन दरांची निश्चिती विधिग्राह्य ठरवणे.

(ख्) ३१ डिसेंबर, १९५४ रोजी प्रारंभ होणाऱ्या व 'किमान वेतन (विशोधन) अधिनियम, १९५७' (१९५७ चा ३०) याच्या प्रारंभदिनांकास संपणाऱ्या; किंवा

(ग्) ३१ डिसेंबर, १९५९ रोजी प्रारंभ होणाऱ्या व 'किमान वेतन (विशोधन) अधिनियम, १९६१' (१९६१ चा ३१) याच्या प्रारंभ दिनांकास संपणाऱ्या—

अशा कालावधीत अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही कामधंद्यात कामावर ठेवलेल्या कामगा-रांना प्रदेय म्हणून समुचित शासनाने किमान वेतन दर ठरवून दिलेले असतील आणि कलम ३, पोटकलम (१) चा खंड (क्) हा 'किमान वेतन (विशोधन) अधिनियम, १९५४' (१९५४ चा २६) किंवा 'किमान वेतन (विशोधन) अधिनियम, १९५७' (१९५७ चा ३०) किंवा किमान वेतन (विशोधन) अधिनियम, १९६१' (१९६१ चा ३१) याच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी जसा अंमलात होता तशा त्या खंडाखाली असे दर निश्चित करण्यात येत आहेत अशा समजुतीने ते ठरवलेले असतील किंवा तशा समजुतीने ते ठरवले असावेत असे दिसत असेल तर, असे दर कायद्यानुसार ठरवण्यात आले असल्याचे मानले जाईल आणि त्या खंडात त्या प्रयोजनार्थ विनिर्दिष्ट केलेली संबद्ध तारीख ते दर निश्चित करण्यात आले त्यावेळी निघून गेली होती एवढ्याच कारणावरून ते कोणत्याही न्यायालयात प्रश्नास्पद करता येणार नाहीत:

परंतु, या कलमात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही कालावधीत एखाद्या व्यक्तीने आपल्या कामगारां-पैकी कोणाही कामगाराला वेतन म्हणून या कलमात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या किमान वेतन दरांपेक्षा कमी रक्कम दिली या कारणावरून अथवा कलम १३ खाली दिलेल्या कोणत्याही आदेशाचे किंवा नियमांचे पूर्वोक्त कालावधीत तिने पालन केले नाही या कारणावरून तिला कोणतीही शिक्षा किंवा कोणत्याही प्रकारची शास्ती होईल अशा रीतीने या कलमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही किंवा लागू होते असा त्याचा अर्थ लावला जाणार नाही.]

---

१. १९६१ चा अधिनियम क्रमांक ३१, कलम ३ द्वारे समाविष्ट केले.

२. वरील अधिनियमाच्या—कलम ४ द्वारे मूळ कलमाऐवजी घातले.

**१. १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ कलम १० द्वारे "सर्वसाधारण कामाचा दिवस" याऐवजी हा मजकूर दाखल केला.**

अनुसूची

[ कलमे २ (छ) व २७ पहा ]

भाग पहिला

१. कोणत्याही लोकरीचे गालिचे बनवण्याच्या किंवा शाली विणण्याच्या कारखान्यातील कामधंदा.
२. कोणत्याही भातगिरणीतील, पिठाच्या गिरणीतील किंवा डाळीच्या गिरणीतील कामधंदा.
३. कोणत्याही तंबाखूच्या कारखान्यातील कामधंदा (यात विडया वळण्याचाही समावेश होतो).
४. कोणत्याही मळयातील म्हणजे सिंकोना, रबर, चहा किंवा कॉफी यांची लागवड करण्यासाठी राखलेल्या कोणत्याही इस्टेटमधील कामधंदा.
५. कोणत्याही तेलाच्या गिरणीतील कामधंदा.
६. कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या अखत्याराखालील कामधंदा.
[1][७. रस्ते तयार करणे किंवा त्यांची देखभाल करणे याबाबतचा किंवा बांधकामांसंबंधीचा कामधंदा.]
८. दगड फोडणे व दगडांची खडी करणे यासंबंधीचा कामधंदा.
९. कोणत्याही लाखेच्या कारखान्यातील कामधंदा.
१०. कोणत्याही अभ्रकाच्या कारखान्यातील कामधंदा.
११. सार्वजनिक मोटारवाहतुकीच्या संबंधातील कामधंदा.
१२. कातडी कमाविण्याच्या व चामडयाच्या वस्तू तयार करण्याच्या कारखान्यातील कामधंदा.

[2][जिप्समच्या खाणीतील कामधंदा. बॅराइट्सच्या खाणीतील कामधंदा. बॉक्साइटच्या खाणीतीलकामधंदा.]

[3][मँगेनिझच्या खाणीतील कामधंदा]

[4][इमारतींची देखभाल करण्यासंबंधीचा कामधंदा आणि धावपट्ट्या बांधणे व त्यांची देखभाल करणे यासंबंधीचा कामधंदा.]

[5][चिनी मातीच्या खाणीतील कामधंदा. कायनाईटच्या खाणीतील कामधंदा.]

[6][तांब्याच्या खाणीतील कामधंदा.]

[7]['खाण अधिनियम, १९५२' (१९५२ चा ३५) याखाली येणाऱ्या मातीच्या खाणीतील कामधंदा.]

[8]['खाण अधिनियम, १९५२' (१९५२ चा ३५) याखाली येणाऱ्या मॅग्नेझाइट खाणीतील कामधंदा.]

[9][पांढऱ्या मातीच्या खाणींमधील कामधंदा.]

[10][दगडांच्या खाणींमधील कामधंदा.]

[1][१३. "मुंबई दुकाने व व्यापारी आस्थापना अधिनियम, १९४८" यात व्याख्या केल्याप्रमाणे असलेले कोणतेही निवासी हॉटेल, उपाहारगृह किंवा खाद्यगृह यांमधील कामधंदा.]

१४. कोणतेही अक्षरमुद्रण, शिलामुद्रण, फोटो ग्रेव्हर यांद्वारे कोणतीही मुद्रण प्रक्रिया किंवा अन्य तत्सम काम किंवा अशा प्रक्रियेशी आनुषंगिक.

---

१. १९५७ चा अधिनियम ३० कलम १८ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले. (भूतलक्षी प्रभावाने)
२. अधिसूचना क्रमांक एस. ओ. ३७६०, दिनांक ४ डिसेंबर, १९६२ द्वारे घातले.
३. अधिसूचना क्रमांक एस.ओ. ४०३०, दिनांक ३० ऑक्टोबर, १९६७ द्वारे घातले.
४. अधिसूचना क्रमांक एस.ओ. १९८७, दिनांक ३० मे, १९६८ द्वारे घातले.
५. अधिसूचना क्रमांक एस.ओ. ५८६, दिनांक ५ फेब्रुवारी, १९७० द्वारे घातले.
६. अधिसूचना क्रमांक एस.ओ. ७९५, दिनांक १३ फेब्रुवारी, १९७० द्वारे घातले.
७. अधिसूचना क्रमांक एस. ओ. ७९६, दिनांक १८ फेब्रुवारी, १९७० द्वारे घातले.
८. अधिसूचना क्रमांक एस.ओ. २३५७, दिनांक १ जुलै, १९७० द्वारे घातले.
९. अधिसूचना क्रमांक एस.ओ. ३८९६, दिनांक ३ सप्टेंबर, १९७१ द्वारे घातले.
१०. अधिसूचना क्रमांक एस. ओ. ३८९८, दिनांक १५ सप्टेंबर, १९७१ द्वारे घातले.

१. सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ५ (३) द्वारे १३ ते १८ या नोंदी वर घालण्यात आली.

असणारे काम किंवा पुस्तकांची बांधणी करण्याचे काम जेथे चालते अशा कोणत्याही उद्योगातील कामधंदा.

१५. कोणत्याही कापूस वटणी किंवा कापूस दाबणी कारखान्यातील कामधंदा.

१६. काच उद्योगधंद्यातील कामधंदा.

१७. [1][ कोणत्याही बँकेतील कामधंदा किंवा अनुसूचीतील नोंदीपैकी कोणत्याही नोंदीत जो समाविष्ट असेल असा कामधंदा वगळून ] कोणत्याही दुकानातील किंवा व्यापारी आस्थापनेतील कामधंदा.

स्पष्टीकरण.---या नोंदीच्या प्रयोजनाकरिता, "दुकान" व "व्यापारी आस्थापना" या संज्ञांना, 'मुंबई दुकाने व व्यापारी आस्थापना अधिनियम, १९४८' यात त्यांना नेमून दिल्याप्रमाणे ते ते अर्थ असतील.

१८. मातीच्या वस्तूंच्या कारखान्यातील कामधंदा. ]

[2][ १९. रबर यंत्रोद्योगातील कामधंदा. ]

[3][ २०. कागद व कागदी पुठ्ठ्यांच्या कारखान्यातील कामधंदा. ]

[4][ २१. चित्रपट प्रदर्शन करण्याच्या उद्योगातील कामधंदा. ]

[5][ २२. फक्त उष्णता आणि/किंवा दाब किंवा दोन्ही यांच्या साहाय्याने प्लॅस्टिक द्रव्य साच्यात दाबून, त्याला आकार देऊन, ते दाबाने साच्यातून बाहेर काढून किंवा साच्यात ओतून त्याचे निरनिराळ्या आकाराच्या घन वस्तूंमध्ये रूपांतर करण्याची कोणतीही प्रक्रिया किंवा अन्य तत्सम काम किंवा अशा प्रक्रियेशी आनुषंगिक असे काम जेथे चालते अशा कोणत्याही उद्योगातील कामधंदा. ]

[6][ २३. या अनुसूचीतील नोंद ६ खाली न येणाऱ्या कोणत्याही रुग्णालयातील कामधंदा.

---

१. सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ११ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

२. शासकीय अधिसूचना, उद्योग व कामगार विभाग, क्रमांक ईएनक्यू-१०६२/सी-१७४३-एलएबी-तीन, दिनांक १ ऑक्टोबर १९६२ द्वारे १९ व २० या नोंदींची भर घालण्यात आली.

३. शासकीय अधिसूचना, उद्योग व कामगार विभाग, क्रमांक एमडब्ल्यूए-५६६२/१२७८९९-एलएबी-तीन, दिनांक ४ एप्रिल १९६४ द्वारे सुधारण्यात आला.

४. शासकीय अधिसूचना, उद्योग व कामगार विभाग, क्रमांक एमएडब्ल्यू-५६६४/८००३६-एलएबी-तीन, दिनांक २० ऑक्टोबर १९६४ द्वारे या नोंदीची भर घालण्यात आली.

५. शासकीय अधिसूचना, उद्योग व कामगार विभाग, क्रमांक एमडब्ल्यूए-५२६४/१०८४८०-एलएबी-तीन, दिनांक १५ ऑक्टोबर १९६५ द्वारे या नोंदीची भर घालण्यात आली.

६. शासकीय अधिसूचना, उद्योग व कामगार विभाग, क्रमांक एमडब्ल्यूए-५८६५/१०२४४०-एलएबी-तीन, दिनांक ३ सप्टेंबर १९६६ द्वारे या नोंदीची भर घालण्यात आली.

स्पष्टीकरण.—या नोंदीच्या प्रयोजनासाठी, "रुग्णालय" याचा अर्थ आजारी असलेल्या वा मानसिक वैगुण्य असलेल्या व्यक्तींना प्रवेश देऊन त्यांच्यावर उपचार करण्यासाठी असलेली संस्था कोणतेही प्रसूतिगृह आणि आजारातून उठलेल्या व्यक्तींना किंवा वैद्यकीय पुनर्वसनाची आवश्यकता असणाऱ्या व्यक्तींना प्रवेश देऊन त्यांच्यावर उपचार करण्यासाठी असलेली कोणतीही संस्था असा होतो आणि त्यामध्ये, उपरोक्त अशा कोणत्याही संस्थेच्या किंवा गृहाच्या संबंधात चालवल्या जाणाऱ्या चिकित्सालयांचा, दवाखान्यांचा आणि बाह्यरुग्ण विभागांचा समावेश होतो.]

[१][२४. विटांच्या किंवा कौलांच्या (टेराकोटाच्या किंवा मातीच्या) कारखान्यातील कामधंदा.]

[२][२५. म्हशी किंवा गाई किंवा दोन्ही जेथे दूध काढण्यासाठी, स्वच्छ करण्यासाठी किंवा चारा घालण्यासाठी आणि इतर सर्व आनुषंगिक प्रक्रियांसाठी ठेवण्यात येतात अशा कोणत्याही जागेतील कामधंदा.]

[३][२६. मोटार दुरुस्ती कर्मशाळा आणि मोटारघरे यांतील कामधंदा.]

[४][२७. या अनुसूचीच्या भाग १ मधील नोंद १३ खाली समाविष्ट न होणाऱ्या आहारगृहांमधील व क्लबांमधील कामधंदा.]

[५][२८. फिल्म निर्मितीच्या उद्योगातील कामधंदा]

स्पष्टीकरण.—या नोंदीच्या प्रयोजनासाठी "फिल्म निर्मितीचा उद्योग" या शब्दप्रयोगामध्ये, चित्रीकरणाचे स्टुडिओ, चित्रीकरणाच्या प्रयोगशाळा आणि चित्रपट निर्मात्यांच्या आस्थापना व क्रियाव्यापार यांचा समावेश होईल.]

[६][२९. यंत्रमाग उद्योगातील कामधंदा.]

---

१. शासकीय अधिसूचना, उद्योग व कामगार विभाग, क्रमांक एमडब्ल्यूए-५२६५/११२४२९-एलएबी-तीन, दिनांक २६ ऑक्टोबर १९६६ याद्वारे नोंदीची भर घातली.

२. शासकीय अधिसूचना, उद्योग व कामगार विभाग, क्रमांक एमडब्ल्यूए-५२६५/११०३३१-एलएबी-तीन, दिनांक २१ मार्च १९६८ याद्वारे नोंद सुधारली.

३. शासकीय अधिसूचना, उद्योग व कामगार विभाग, क्रमांक एमडब्ल्यूए-५२६७/११६७१०-एलएबी-तीन, दिनांक १ जून १९६८ याद्वारे नोंदी २५ व २६ यांची भर घातली.

४. शासकीय अधिसूचना, उद्योग व कामगार विभाग, क्रमांक एमडब्ल्यूए-५२६८/९१४०३-एलएबी-तीन, दिनांक ६ सप्टेंबर १९६८ याद्वारे नोंदीची भर घातली.

५. शासकीय अधिसूचना, उद्योग व कामगार विभाग, क्रमांक एमडब्ल्यूए-५२६८/९७०८२-एलएबी-तीन, दिनांक २८ जानेवारी १९६९ याद्वारे नोंदीची भर घातली.

६. शासकीय अधिसूचना, उद्योग व कामगार विभाग, क्रमांक एमडब्ल्यूए-५०६७/१३७६८३-एलएबी-तीन, दिनांक १५ मार्च १९६९ याद्वारे नोंदीची भर घातली.

[१][३०. लाकूड कटाईचे काम चालणाऱ्या कोणत्याही उद्योगातील कामधंदा.]

३१. ज्यामध्ये लाकडी फर्निचर बनविण्याचे काम किंवा अन्य तत्सम काम किंवा अशा प्रक्रियेशी आनुषंगिक असे कोणतेही काम चालते त्या कोणत्याही उद्योगामधील कामधंदा.

३२. ज्यामध्ये छायाचित्राच्या किंवा चित्राच्या लाकडी चौकटी बनविण्याचे काम किंवा अन्य तत्सम काम किंवा अशा प्रक्रियेशी आनुषंगिक असे कोणतेही काम चालते त्या कोणत्याही उद्योगामधील कामधंदा.

[२][३३. बेकऱ्यांमधील कामधंदा.]

[३][३४. मिठागरामधील कामधंदा.]

[४][३५. काजू प्रक्रिया उद्योगामधील कामधंदा.]

[५][३६. अभियांत्रिकी उद्योगातील कामधंदा (या भागातील २६ व्या नोंदीखाली येणारा कामधंदा सोडून अन्य) म्हणजेच लोही व अलोही धातू किंवा कोणतेही मिश्र धातू यांपासून बनवलेली कोणतीही यंत्रसामग्री, हत्यारे, उपकरणे, पात्रे किंवा वस्तू किंवा त्यांचे भाग यांच्याशी संबंधित अशी कोणतीही निर्मिती-प्रक्रिया (मोटारवाहन उद्योगासाठी उपसाधक अशी उत्पादने बनवणे, सुटच्या भागांसकट सायकली बनवणे यासुद्धा) आणि त्या प्रक्रियेशी निगडित असलेल्या प्रक्रिया म्हणजे आकार देणे, दाब देणे, दाबाने साच्यातून बाहेर काढणे, कातकाम करणे, पूर्वरचना करणे, संस्करण करणे, धातू गाळणे, परिष्करण करणे, वेधणे, कापणे, जोडणे, दळणे, घडकाम करणे, सांधणे, पॉलिश करणे, विद्युत-बिलेपन करणे आणि साच्यात दाबणे अशांसारख्या प्रक्रिया जेथे चालतात अशा कोणत्याही उद्योगातील कामधंदा.

---

१. शासकीय अधिसूचना, उद्योग व कामगार विभाग, क्रमांक एमडब्ल्यूए-५२६९/१४४४९५-एलएबी-तीन, दिनांक १५ डिसेंबर १९६९ याद्वारे नोंदी ३०, ३१ व ३२ यांची भर घातली.

२. शासकीय अधिसूचना, उद्योग व कामगार विभाग, क्रमांक एमडब्ल्यूए-५२६९/११५१९८-एलएबी-तीन, दिनांक २५ जून १९७० याद्वारे नोंदीची भर घातली.

३. शासकीय अधिसूचना, उद्योग व कामगार विभाग, क्रमांक एमडब्ल्यूए-५२८/१४५६७७-एलएबी-तीन-ए, दिनांक ८ मे १९७२ याद्वारे नोंदीची भर घातली.

४. पहा—महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक-एल, दिनांक १३ जुलै १९७२ याच्या पृष्ठ ४५९० वर प्रसिद्ध केलेली शासकीय अधिसूचना, उद्योग व कामगार विभाग, क्रमांक एमडब्ल्यूए-४३७०/१११८७८-एलएबी-तीन-ए, दिनांक १९ जून १९७२.

५. पहा—महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक-एल, दिनांक २९ मार्च १९७३ याची पृष्ठे २७२६-२७२७ यांवर प्रसिद्ध केलेली शासकीय अधिसूचना, उद्योग व कामगार विभाग, क्रमांक एमडब्ल्यूए-६२६१/१२८७६६-एलएबी-तीन-ए, दिनांक ७ मार्च १९७३.

स्पष्टीकरण.---या नोंदीच्या प्रयोजनासाठी "निर्मिती प्रक्रिया" या शब्दप्रयोगास, कारखाना अधिनियम, १९४८ याच्या कलम २, खंड(२) मध्ये त्याला नेमून दिल्याप्रमाणे तोच अर्थ असेल.]

[१][३७. कापड रंगविण्याचा आणि/किंवा कापडावर छपाई करण्याचा कामधंदा.]

[२][३८. धोबीकामाच्या उद्योगातील कामधंदा.]

[३][३९. मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायवादीच्या आस्थापनेतील कामधंदा.]

[४][४०. या अनुसूचीतील नोंद ६ किंवा २३ याखाली समाविष्ट असलेल्या कोणत्याही रुग्णालयातील दवाखाना सोडून अन्य कोणत्याही दवाखान्यातील कामधंदा.]

[५][४१. कागद आणि/किंवा पुठ्ठा आणि/किंवा गवतापासून तयार केलेला पुठ्ठा यापासून पेट्या आणि/किंवा खोके बनवण्याच्या यंत्रोद्योगातील कामधंदा.]

[६][४२. मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या अधिवक्त्यांनी किंवा न्यायवादींनी अथवा असे अधिवक्ते किंवा न्यायवादी मिळून झालेल्या कोणत्याही अधिसंघाने, संस्थेने किंवा अन्य निकायाने विधिव्यवसायाच्या संबंधात ठेवलेल्या आस्थापनामधील कामधंदा.]

---

१ पहा.---महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक-एल, दिनांक २९ मार्च १९७३ याच्या पृष्ठ २७२७ वर प्रसिद्ध केलेली शासकीय अधिसूचना, उद्योग व कामगार विभाग, क्रमांक एमडब्ल्यूए-६२७१/१२६३८८/एल-एबी-तीन-ए, दिनांक ७ मार्च १९७३.

२ पहा.---महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक-एल, दिनांक १६ नोव्हेंबर १९७२ याच्या पृष्ठ ७२५५ वर प्रसिद्ध केलेली शासकीय अधिसूचना, उद्योग व कामगार विभाग, क्रमांक एमडब्ल्यूए-५२७१/१३२६११/एलएबी-तीन-ए, दिनांक ३० ऑक्टोबर १९७२.

३ पहा.---महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक-एल, दिनांक २९ मार्च १९७३ याच्या पृष्ठ २७२७ /वर प्रसिद्ध केलेली शासकीय अधिसूचना, उद्योग व कामगार विभाग, क्रमांक एमडब्ल्यूए-५२७१/ १३५८१२/एल-एबी-तीन-ए, दिनांक ७ मार्च १९७३.

४ पहा.---महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक-एल, दिनांक ५ जुलै १९७३ याच्या पृष्ठ ५७१८ वर प्रसिद्ध केलेली शासकीय अधिसूचना, उद्योग व कामगार विभाग, क्रमांक एमडब्ल्यूए-५८७१/१७५५५१/एल-एबी-तीन-ए, दिनांक २० जून १९७३.

५ पहा.---महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक-एल, दिनांक १ नोव्हेंबर १९७३ याच्या पृष्ठ ९३४० वर प्रसिद्ध केलेली शासकीय अधिसूचना, उद्योग व कामगार विभाग, क्रमांक एमडब्ल्यूए-५२७१/१८०२६९/एल-एबी-तीन-ए, दिनांक १८ ऑक्टोबर १९७३.

६ पहा.---शासकीय अधिसूचना, उद्योग व कामगार विभाग, क्रमांक एमडब्ल्यूए-५२७१/१९८४१५/के/एलएबी-तीन-एके, दिनांक ५ फेब्रुवारी १९७५ द्वारे भर घातली.

[१][४३. खांडसरी साखर कारखान्यातील कामधंदा.]

[२][४४. अनुसूचीच्या भाग दोनखाली अंतर्भूत नसलेल्या गवत-कापणीचा कामधंदा.]

[३][४५. केश कर्तनालय, केशभूषालय किंवा हमामखाना यांमधील कामधंदा.]

[४][४६. तयार कपडे बनविण्याच्या किंवा त्याच्याशी आनुषंगिक वस्तू बनविण्याच्या (होजिअरी वस्तू वगळून) कामात गुंतलेली कोणतीही आस्थापना आणि शिंपीकाम आस्थापना यांतील कामधंदा.]

[५][४७. प्लॅस्टिक, बॅकेलाइट, एबोनाइट किंवा इतर कोणत्याही धातूपासून फाऊंटनपेन्स, बॉल पॉइंट पेन्स आणि/किंवा त्यांचे सुटे भाग आणि/किंवा निब, रिफिल, यांसारख्या आनुषंगिक वस्तू बनविण्याचा कामधंदा.]

[६][४८. या अनुसूचीतील इतर नोंदीपैकी कोणत्याही सदराखाली न येणाऱ्या कामधंद्यातील सफाईगार व मेहेतर म्हणून कामधंदा.]

[७][४८क. जस्त, पितळ, तांबे, अल्युमिनिअम, स्टेनलेस स्टील याच्या आणि/किंवा इतर धातुंच्या अवमिश्रणासहित किंवा त्याशिवाय भांडी आणि/किंवा इतर गृहोपयोगी वस्तू तयार करण्याच्या कोणत्याही आस्थापनेतील कामधंदा.]

[८][४९. जंगलातील आणि/किंवा जंगल-लागवड-विषयक कामधंदा.]

---

१. पहा—शासकीय अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक एमडब्ल्यूए-५२७५/३११/एलएबी-७, दिनांक १९ जुलै १९७६.

२. पहा—शासकीय अधिसूचना, उद्योग व कामगार विभाग, क्रमांक एमडब्ल्यूए-३०४/एलएबी-७ दिनांक २७ जुलै १९७६.

३. पहा.—शासकीय अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक एमडब्ल्यूए-४२७५/११०/एलएबी-७, दिनांक १० नोव्हेंबर १९७६.

४. शासकीय अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक एमडब्ल्यूए-४२७४/८९६/एलएबी-७, दिनांक ११ जानेवारी १९७७ याद्वारे नोंदीची भर घातली.

५. शासकीय अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक एमडब्ल्यूए-५२७६/६२१/एलएबी-७, दिनांक ३० मार्च १९७७ याद्वारे नोंदीची भर घातली.

६. शासकीय अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक एमडब्ल्यूए-२३७५/(२०१)/एलएबी-७, दिनांक ३० मार्च १९७७ याद्वारे नोंदीची भर घातली.

७. शासकीय अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक एमडब्ल्यूए-३८७६/११८९/एलएबी-७, दिनांक ३० मार्च १९७७ याद्वारे नोंदीची भर घातली.

८. शासकीय अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक एमडब्ल्यूए-२३७०/९४८/एलएबी-७, दिनांक २२ ऑगस्ट १९७७ याद्वारे नोंदीची भर घातली.

[१][५०. सरक्याच्या फेण्या बनवण्याचा कामधंदा.]

[२][५१. हातमाग उद्योगातील कामधंदा]

[३][५२. खाण्यास योग्य तंबाखू बनविण्याचा कामधंदा (अनुसूचीच्या पहिल्या भागामधील तिसऱ्या नोंदीखाली येणारा कामधंदा नव्हे).]

[४][५३. हाताने बनवण्याचा कागद आणि हाताने बनवण्याचा कागदी पुठ्ठा यांच्या कारखान्यातील कामधंदा].

[५][५४. लिखाणाच्या वह्या किंवा त्यासारख्या इतर चोपड्या/पुस्तके (त्यात हिशेबवह्या, खातेवह्या, रोजकीर्द इत्यादींचा समावेश आहे) लिहिण्याच्या प्रयोजनार्थ तयार करण्याचा कामधंदा तसेच, त्यामध्ये रेषा आखणे, घड्या घालणे, शिवणे, बांधणी करणे इत्यादी प्रक्रिया आणि इतर आनुषंगिक छपाई व इतर कोणतेही आनुषंगिक काम यांचाही यात समावेश आहे. (मात्र या अधिनियमाच्या अनुसूचीतील पहिल्या भागातील कोणत्याही नोंदीखाली समावेश केलेली नव्हे).]

[६][५५. सायकल यांत्रिक कार्यशाळेतील कामधंदा (त्यात सायकल दुरुस्ती, संधारण आणि इतर आनुषंगिक कामे यांचा समावेश आहे.)]

[७][५६. सिमेंटच्या व सिमेंटवर आधारित उद्योगातील कामधंदा.]

---

१. पहा—महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक-एल, दिनांक १६ फेब्रुवारी १९७८ याच्या पृष्ठ क्रमांक १४४ वर प्रकाशित केलेली शासकीय अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक एमडब्ल्यूए-६२७५/८०६/एलएबी-७, दिनांक १ डिसेंबर १९७७.

२. पहा—महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक-एल, दिनांक ३१ जानेवारी १९८० याच्या पृष्ठ क्रमांक ६७० वर प्रसिद्ध केलेली शासकीय अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक एमडब्ल्यूए-५२७९/२४९८/एलएबी-७, दिनांक २ जानेवारी १९८०.

३. शासकीय अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक एमडब्ल्यूए-१५८१/३०५९/एलएबी-७, दिनांक १० डिसेंबर १९८१ याद्वारे नोंदीची भर घातली.

४. शासकीय अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक एमडब्ल्यूए-५६८१/४४६०/एलएबी-७, दिनांक २३ फेब्रुवारी १९८२ याद्वारे नोंदीची भर घातली.

५. शासकीय अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक एमडब्ल्यूए-५२८२/४६६९/एलएबी-७, दिनांक ७ फेब्रुवारी १९८४ याद्वारे नोंदीची भर घातली.

६. शासकीय अधिसूचना, क्रमांक एमडब्ल्यूए-५६८४/४२४९/एलएबी-७, दिनांक १९ जानेवारी १९८५ याद्वारे नोंदीची भर घातली.

७. शासकीय अधिसूचना, क्रमांक एमडब्ल्यूए-५२८१/४२४२/एलएबी-८७, दिनांक १८ जानेवारी १९८५ याद्वारे नोंदीची भर घातली.

[१][५७. साळी किंवा तांदूळ यापासून पोहे, मुरमुरे, चुरमुरे, कुरमुरे बनवण्याच्या, तसेच मक्यापासून भरडा किंवा नरडा बनविण्याच्या उद्योगातील कामधंदा.]

[२][५८. कोणत्याही रासायनिक खताची निर्मिती करण्याच्या व त्यांच्याशी आनुषंगिक प्रक्रियेच्या संबंधातील कामधंदा.]

भाग दुसरा

१. शेतकी कामधंदा म्हणजे कोणत्याही प्रकारच्या शेतकामासंबंधी कामधंदा. यात जमिनीची नांगरट, कसणूक, दुग्धशाळा उद्योग, कोणत्याही शेतकी किंवा बागायती मालाचे उत्पादन करणे, लागवड करणे, तो पिकवणे व ते पीक कापणे, गुरे, मधमाशा किंवा कोंबड्या, बदके इत्यादींची पैदास आणि शेतकामाला आनुषंगिक किंवा त्याच्याशी संलग्न म्हणून शेतकऱ्याचा किंवा शेतावर जे काम करण्याचा शिरस्ता असतो असे काम (यात कोणतीही रानशिवारासंबंधीची कामे, शेतमाल बाजारात पाठविण्याची तयारी करणे व तो साठवणीसाठी किंवा बाजारात पोचवण्यासाठी सुपूर्द करणे किंवा बाजारापर्यंत नेण्यासाठी गाडीवर पोचवणे या कामाचा समावेश आहे.)

[३][२. कांदे साफ करण्याचा व निवडून काढण्याचा कामधंदा आणि इतर आनुषंगिक काम.]

---

१. शासकीय अधिसूचना, क्रमांक एमडब्ल्यूए-५६८०/सीआर-२९३२/एलएबी-७, दिनांक १७ फेब्रुवारी १९८५ याद्वारे नोंदीची भर घातली.

२. शासकीय अधिसूचना, क्रमांक एमडब्ल्यूए-५२८१/१००४१/सीआर-४५३७/एलएबी-७, दिनांक ११ फेब्रुवारी १९८५ याद्वारे नोंदीची भर घातली.

३. पहा, महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक-एल, दिनांक ३० ऑक्टोबर, १९८० याच्या पृष्ठ क्रमांक ९०२३ वर प्रसिद्ध केलेली शासकीय अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक एमडब्ल्यूए-५२७९/२४९१/एलएबी-७, दिनांक २ ऑगस्ट,१९५०.

# THE MINIMUM WAGES ACT, 1948

## मराठी–इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अतिकालिक दर | overtime rate | [क. ३(२)(घ्)] |
| अनुसूचित कामधंदा | scheduled employment | [क.२(छ्)] |
| अभावित चूकभूल | accidental slip or omission | [क.१०(१)] |
| उक्ते काम | piece work | [क.१७] |
| ऐनजिनसी वेतन | wages in kind | [क.११.स.टी.] |
| (पिकाची) कापणी करणे | harvesting | [अनुसूची भाग दुसरा] |
| कामकाज चालवणे | transaction of business | [क.२९] |
| कामधंदा | employment | [पूर्ण शीर्षक] |
| कामाचे अंग | branch of work | [क.२(छ्)] |
| कामावारी दर | piece rate | [क.१७] |
| कारभार चालवणे | conduct of business | [क.२९] |
| किशोर | adolescent | [क.२(क्)] |
| जमिनीची नांगरट व कसणूक | cultivation and tillage of soil | [अनुसूची भाग दुसरा] |
| त्रास देण्याच्या हेतूने केलेला | vexatious | [क.२०(४)] |
| दुग्धशाळा उद्योग | dairy farming | [अनुसूची भाग दुसरा] |
| द्वेषबुद्धीने केलेला | malicious | [क.२०(४)] |
| धावपट्टया | runways | [अनुसूची भाग पहिला] |
| नांगरट | cultivation (of soil) | [अनुसूची भाग दुसरा] |
| निसर्गाची लहरी वृत्ती | irregular action of natural forces | [क.१३(२)(ङ)] |
| पारिश्रमिक | remuneration | [क.२(ज्)] |
| प्रौढ | adult | [क.२(क्)] |
| बालक | child | [क.२(क्)] |
| बाहेरचा कामगार | out-worker | [क.२(एक)] |
| रानशिवारासंबंधीची कामे | forestry or timbering operations | [अनुसूची भाग दुसरा] |
| राहणीमान निर्देशांक | cost of living index number | [क.२(घ्)] |
| राहणीखर्च भत्ता | cost of living allowance | [क.४(१)(एक)] |
| लागवड करणे | cultivation of agricultural (commodities) | [अनुसूची भाग दुसरा] |
| वेतन | wages | [क.२(ज्)] |
| वेतन कालावधी | wage periods | [क.३(३)(ख्)] |
| वेतनपत्रिका | wage slips | [क.१८(३)] |
| वेतनपुस्तिका | wage books | [क.१८(३)] |
| वेळेवारी काम | time work | [क.३(२)(क्)] |
| वेळेवारी कामाचे तत्त्व | time work basis | [क.३(२)(ग्)] |
| वेळेवारी दर | time rate | [क.३(२)(क्)] |
| वैतनिक दंडाधिकारी | stipendiary Magistrate | [क.२०(१)] |
| शिकाऊ उमेदवार | apprentice | [क.३(३)(क्)(तीन)] |
| शिरस्ता | practice | [अनुसूची भाग दुसरा] |
| शेतमाल | farm produce | [अनुसूची भाग दुसरा] |
| शेतावरील कामे | farm operations | [अनुसूची भाग दुसरा] |
| संविदेद्वारे दायित्वमुक्त करणे | contracting out | [क.२५.स.टी.] |
| सतत लक्ष ठेवणे | sustained attention | [क.१३(३)] |
| सवलतीचे रोख मूल्य | cash value of concession | [क.४(१)(दोन)] |
| सामाजिक विमा | social insurance | [क.२(ज्)(दोन)] |
| सेवामुक्ती | discharge | [क.२(ज्)(पाच)] |
| हस्तदोष किंवा आकडेमोडविषयक चूका | clerical or arithmetical mistakes | [क.१०(१)] |

# THE MINIMUM WAGES ACT, 1948

## किमान वेतन अधिनियम, १९४८

### इंग्रजी–मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| accidental slip or omission .. | अभावित चूकभूल .. | [ S.10(1) ] |
| adolescent .. | किशोर .. | [ S.2(*a*) ] |
| adult .. | प्रौढ .. | [ S.2(*a*) ] |
| apprentice .. | शिकाऊ उमेदवार .. | [ S.3(3)(*a*)(*iii*) ] |
| branch of work .. | कामाचे अंग .. | [ S.2(*g*) ] |
| cash value of concession .. | सवलतीचे रोख मूल्य .. | [ S.4(*1*)(*ii*) ] |
| child .. | बालक .. | [ S.2(*a*) ] |
| clerical or arithmetical mistakes | हस्तदोष किंवा आकडेमोडविषयक चूका | [ S.10(1) ] |
| conduct of business .. | कारभार चालवणे .. | [ S.29 ] |
| contracting out .. | संविदेद्वारे दायित्वमुक्त करणे .. | [ S.25-m.n. ] |
| cost of living allowance .. | राहणीखर्च भत्ता .. | [ S.4(1)(*i*) ] |
| cost of living index number .. | राहणीमान निर्देशांक .. | [ S.2(*d*) ] |
| cultivation 1. (of soil) .. | नांगरट .. | [ Sch.Part-II ] |
| 2. (of agricultural commodity) | लागवड करणे .. | [ Sch.Part-II ] |
| cultivation and tillage of the soil | जमिनीची नांगरट व कसणूक .. | [ Sch.Part-II ] |
| dairy farming .. | दुग्धशाळा उद्योग .. | [ Sch.-Part II ] |
| discharge .. | सेवामुक्ती .. | [ S.2(*h*)(*v*) ] |
| employment .. | कामधंदा .. | [ Long title ] |
| farm operations .. | शेतावरील कामे .. | [ Sch. Part-II ] |
| farm produce .. | शेतमाल .. | [ Sch.Part-II ] |
| forestry or timbering operations | रानशिवारासंबंधीची कामे .. | [ Sch.Part-II ] |
| harvesting .. | (पिकाची) कापणी करणे .. | [ Sch. Part-II ] |
| irregular action of natural forces | निसर्गाची लहरी वृत्ती .. | [ S. 13(*2*)(*e*) ] |
| malicious .. | द्वेषबुद्धीने केलेला .. | [ S.20(4) ] |
| out-worker .. | बाहेरचा कामगार .. | [ S. 2(*i*) ] |
| overtime rate .. | अतिकालिक दर .. | [ S.3(2)(*d*) ] |
| piece rate .. | कामावारी दर .. | [ S.17 ] |
| piece work .. | उक्तेकाम .. | [ S.17 ] |
| practice .. | शिरस्ता .. | [ Sch.Part-II ] |
| remuneration .. | पारिश्रमिक .. | [ S.2(*h*) ] |
| runways .. | धावपट्टया .. | [ Sch.Part-I-12 ] |
| scheduled employment .. | अनुसूचित कामधंदा .. | [ S. 2(g) ] |
| social insurance .. | सामाजिक विमा .. | [ S. 2(*h*)(*ii*) ] |
| stipendiary Magistrate .. | वैतनिक दंडाधिकारी .. | [ S. 20(1) ] |
| sustained attention .. | सतत लक्ष ठेवणे .. | [ S. 13(3) ] |
| time rate .. | वेळेवारी दर .. | [ S. 3(2) (*a*) ] |
| time work .. | वेळेवारी काम .. | [ S. 3(2)(*a*) ] |
| time work basis .. | वेळेवारी कामाचे तत्त्व .. | [ S.3(2)(*c*) ] |
| transaction of business .. | कामकाज चालवणे .. | [ S. 2g ] |
| vexaticus .. | त्रास देण्याच्या हेतूने केलेला .. | [ S. 20(4) ] |
| wage books .. | वेतनपुस्तिका .. | [ S. 18(3) ] |
| wage periods .. | वेतन कालावधी ... | [ S. 3(3)(*b*) ] |
| wages .. | वेतन .. | [ S.2(*h*) ] |
| wages in kind .. | ऐनजिनसी वेतन ... | [ S. 11-m.n. ] |
| wage slips .. | वेतनपत्रिका .. | [ S. 18(3) ] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई